सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ९ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नरेंद्र मोदी पंतप्रधान का बनले? सरन्यायाधीश भूषण गवईंनी थेट लंडनमधून सांगितले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९लंडन**

नरेंद्र मोदी हे भारताचे पंधरावे पंतप्रधान असून त्यांनी सलग तीन वेळा ही जबाबदारी सांभाळली आहे. नरेंद्र मोदी २६ मे २०१४ रोजी प्रथमच पंतप्रधान झाले. भारतीय जनता पक्षाने २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवत पूर्ण बहुमत मिळवले होते. त्यानंतर ३० मे २०१९ त्यांनी रोजी दुसऱ्यांदा शपथ घेतली. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) बहुमत मिळवले आणि नरेंद्र मोदी यांनी ९ जून २०२४ रोजी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली.

नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान म्हणून कार्यकाळाला ११ वर्ष पूर्ण झाली आहेत. अशा स्थितीत अलिकडेच सरन्यायाधीश



पदाची शपथ घेतलेल्या न्या.भूषण गवई यांनी मोदी यांच्या पंतप्रधान यांच्या पदावर भाष्य केले आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान पदावर कशामुळे पोहोचले यावर सरन्यायाधीश गवई यांनी विधान केले. सरन्यायाधीश गवई यांनी लंडनच्या ग्रेज इन येथे आयोजित व्याख्यानात हे विधान केले.

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई सध्या युनायटेड किंगडमच्या (युके) दौऱ्यावर आहेत. युकेमध्ये न्या.गवई सातत्याने अनेक कार्यक्रमात सहभाग घेत असून अनेक महत्वपूर्ण विधान करत आहे. दोन दिवसांपूर्वी युकेच्या सर्वोच्च न्यायालयात जाऊन त्यांनी निवृत्त न्यायाधीशांबाबत मोठे विधान केले होते. न्यायाधीशांनी निवृत्तीनंतर लगेच शासकीय पद स्वीकारल्याने किंवा निवडणुका लढवल्याने न्यायिक नैतिकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतो. यामुळे लोकांचा न्यायपालिकेवरील विश्वास ढासळतो, अशा शब्दात सरन्यायाधीशांनी निवृत्त न्यायाधीशांना इशाराच दिला होता. आता त्यांनी थेट पंतप्रधान, राष्ट्रपती यांच्यावर भाष्य केले. न्या. गवई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीमुळेच सर्वसामान्य पार्श्वभूमीच्या व्यक्तीला भारताच्या सर्वोच्च पदांवर पोहोचण्याची संधी मिळाली, असे नम्रपणे सांगितले.

मी जन्माने अस्पृश्य नव्हे, तर भारतीय नागरिक म्हणून जन्मलो, हे केवळ बाबासाहेबांच्या संविधानामुळे शक्य झाले, असे ते म्हणाले. संविधानाचे ७५ वर्षे पूर्ण होत असताना देशाने दोन महिला राष्ट्रपती बघितल्या. सध्याच्या राष्ट्रपती केवळ महिला नाहीत तर वंचित आदिवासी घटकातून येतात. भारताने महिला पंतप्रधान, दलित सरन्यायाधीश, दोन दलित लोकसभा अध्यक्ष बघितले आणि सध्या संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षात देशाची राष्ट्रपती महिला आहे, आदिवासी घटकातून आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मागासवर्गीय घटकातून येतात आणि संविधानामुळेच हे शक्य झाले असल्याचे अभिमानाने सांगतात, असेही सरन्यायाधीशांनी भाषणात सांगितले. डॉ. आंबेडकरांनी मांडलेली स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता ही त्रिसूत्री एकत्रितपणे लोकशाहीची खरी ताकद आहे, असे मतही गवई यांनी अधोरेखित केले.

## लोकलमधून पडून चार प्रवाशांचा मृत्यू अपघातामध्ये एका महिलेचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ठाणे**

धावत्या लोकल रेल्वेमधून पडून किमान ४ प्रवाशांचा मृत्यू झाल्याचीघटना आज सकाळाच्या सुमारास घडली आहे. ही घटना दिवा ते मुंब्रा स्थानकादरम्यान घडली आहे. मृतांमध्ये रेल्वे पोलीस कर्मचाऱ्याचा समावेश आहे. विकी मुख्यदल असं मृत कर्मचाऱ्याचं नाव आहे. चौघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी ठाण्याच्या शासकीय रुग्णालयात आणल्याची माहिति रुग्णालय प्रशासनानं दिली आहे. धावत्या रेल्वेमधून गर्दीच्या रेट्यानं १२ ते १५ प्रवासी पडल्याची माहिती समोर आली आहे. कसाराहून मुंबईकडे जाणाऱ्या फास्ट लोकलमध्ये असलेल्या गर्दीमुळं हे प्रवासी खाली पडलेत. सकाळी झालेल्या भीषण अपघातामध्ये ४ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. तर ९ जण जखमी असून त्यापैकी दोघांची



प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज सकाळी ९ वाजल्याच्या सुमारास कसारा फास्ट लोकलमधून प्रवास करणाऱ्या १२ ते १५ प्रवाशांपैकी काहीजण रेल्वे ट्रॅकवर तर काही प्रवासी मुंब्रा स्थानकावर पडले. सकाळच्या वेळी कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्यानं ही दुर्घटना झाल्याचं सांगितलं जात आहे. मृत प्रवाशांच्या नातेवाईक आणि जखमी प्रवाशांच्या नातेवाईकांनी रुग्णालयात एकच गर्दी केली आहे.

एका प्रत्यक्षदर्शीनं सांगितलं, लोकलमध्ये प्रचंड गर्दी असल्यानं काही प्रवासी डब्याच्या दारांना लटकत होते. त्याचवेळी लखनौला जाणारी पुष्पक एक्सप्रेस लोकलच्या बाजूनं जात होती. लोकलच्या दारावर उभे असलेले प्रवासी हे पुष्पक एक्सप्रेसच्या धडकेने खाली कोसळले.

## पीओपी गणेश मूर्तीवरील बंदी उठवली, हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय; मूर्तिकार अन् मंडळांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

गणेशोत्सवपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. पीओपी (प्लास्टर ऑफ पॅरिस) गणेश मूर्तीवरील बंदी आता उठवण्यात आली आहे. या निर्णयामुळे मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांमध्ये समाधानाचं वातावरण निर्माण झालं आहे.




मुंबई उच्च न्यायालयाने पीओपी गणेश मूर्ती तयार करणे आणि विक्री करण्यावर असलेली बंदी उठवली आहे. मात्र, या मूर्तीचे विसर्जन हे नैसर्गिक जलस्रोतांऐवजी कृत्रिम तलावांमध्येच करण्याची अट कायम राहणार आहे. या निर्णयावर न्यायालयात दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली आहे.

तर न्यायालयाने राज्य सरकारला तीन आठवड्यांच्या आत एक समिती नेमून पीओपी मूर्तींच्या विसर्जनासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातील, त्याविषयी सविस्तर आणि सखोल माहिती न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयानंतर आता घरगुती गणपतीसाठी बनवलेल्या छोट्या पीओपी गणेश मूर्ती साकारण्यास आणि गणेशोत्सव मंडळांमध्येही अशा मूर्ती विराजमान करण्यास कोणताही अडथळा राहिलेला नाही. मात्र, पर्यावरणपूरक विसर्जनाच्या अटींचे पालन अनिवार्य राहील. या निर्णयामुळे अनेक मूर्तिकारांना दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या मूर्ती विरुद्ध शाडूच्या मूर्ती हा वाद सध्या सुरू आहे. विशिष्ट परिस्थितीत पीओपीला परवानगी देणे शक्य असल्याचा दावा राज्य सरकारने याआधी उच्च न्यायालयात केला आहे. समितीच्या शिफारशींचा अहवाल निर्णयासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) पाठवल्याचेही न्यायालयात सांगण्यात आले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) वापरावरील बंदी संदर्भात राज्य सरकारनं केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) समितीचा अहवाल ५ मे रोजी पाठवला आहे.केवळ कृत्रिम तलावातच विसर्जन होणार :पीओपीच्या मूर्तीकार संघटनेला मोठा दिलासा – पीओपी बंदीमुळं गणेश मूर्तिकारांचा मोठा रोजगार जाणार असल्याचा दावा करत ठाण्यातील श्रीगणेश मूर्तीकार कामगार संघटनेनं मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. साल २०२० मध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं पीओपीच्या मूर्तीवर बंदी घातली होती. मात्र विविध कारणांमुळं या निर्णयाची अंमलबजावणी आजवर करण्यात आलेली नाही. त्यामुळं याविरोधात पर्यावरणवादी रोहित जोशी आणि इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयानं यंदाच्या माघी गणेशोत्सवापासून पीओपीबंदीचा निर्णय लागू केला होता. मात्र, आता नव्या नियमावलीनुसार पीओपीच्या मूर्ती केवळ कृत्रिम तलावातच विसर्जित केल्या जातील, या अटीवर त्यांना परवनागी देण्यात आली आहे.

## बच्चू कडू यांच्या आंदोलनाला राकेश टिकैत यांचा जाहीर पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

प्रहार जनशक्तीचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नसानसात आंदोलन भरलेलं आहे. सध्याचे देशातील सरकार हे आंदोलनकर्त्यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे आगामी काळात आंदोलन करणाऱ्यांची संख्या खूपच कमी असेल... आंदोलनकर्त्ये खूपच कमी असतील. मात्र बच्चू कडू हे यातीलच एक आहेत जे शेतकऱ्यांसाठी लढत राहतील असं म्हणत शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी बच्चू कडू यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तसेच सातबारा कोरा करण्यासह इतर काही मागणीसाठी बच्चू कडू यांनी



मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी बेमुदत अन्नत्याग आंदोलन केलं आहे. या आंदोलनाला राकेश टिकैत यांनी आज भेट दिली. तसेच टिकैत यांनी यावेळी कडू यांच्या आंदोलनाला आपला पाठिंबा जाहीर केला.

आपल्या भाषणात राकेश टिकैत म्हणाले, शेतकऱ्यांच्या लढाईत महाराष्ट्र, उत्तरप्रदेश आणि हरियाणाचा लढा हा कायम एकत्रित राहिला आहे. बच्चू कडू हे काय आज आंदोलन करत नाहीत.. शेतकऱ्यांसाठीचा त्यांचा लढा हा मागील अनेक वर्षांपासून सुरु आहे. जेव्हा ते आमदार होते तेव्हा ते विधानभवनात शेतकऱ्यांसाठी बोलायचे, आता ते आमदार नाहीत तरीही शेतकऱ्यांसाठी तसेच दिव्यांगांसाठी आंदोलन करत आहेत. आज महाराष्ट्र आणि केंद्रात जे सरकार सत्तेत आहे ते आंदोलन कर्त्यांना, तसेच इतर राजकीय पक्षांना दाबण्याचा प्रयत्न करतात. धार्मिक मुद्द्याच्या नावाखाली एकमेकांना भडकवण्याचे काम सुरु आहे. अशा या सरकार विरोधात आंदोलन करणाऱ्या बच्चू कडू यांच्या रक्तातच आंदोलनाची धार आहे असं म्हंटल राकेश टिकैत यांनी बच्चू कडू यांचं कौतुक केलं.

राकेश टिकैत पुढे म्हणाले, म्हणाले, भारतात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या या महाराष्ट्रात बघायला मिळतात. खरं तर संपूर्ण देशात जी कृषी पॉलिसी लागू आहे तीच महाराष्ट्रातही आहे, मात्र तरीही महाराष्ट्रातूनच सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या करत आहेत कारण याठिकाणी शेतकऱ्यांची मजबूत अशी संघटना नाही. सध्याचे देशातील सरकार हे आंदोलनकर्त्यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे आगामी काळात आंदोलन करणाऱ्यांची संख्या खूपच कमी असेल... आंदोलनकर्त्ये खूपच कमी असतील. मात्र बच्चू कडू हे यातीलच एक आहेत जे शेतकऱ्यांसाठी लढत राहतील असं राकेश टिकैत यांनी म्हंटल.

## वन विभागाच्या पुरस्कार वितरणात 'गडबड' - ठाणे विभागीय व्यवस्थापका विरोधात तक्रारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राज्याच्या वन विभागाने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना जागतिक वन दिनाचे औचित्य साधून २१ मार्च २०२५ रोजी मुंबई येथे शानदार सोहळ्यात ७९ जणांना सुवर्ण, रजत पदकांनी गौरविले. मात्र, या पदकांच्या यादीत गैरप्रकार झाला असून, पदकासाठी वनपालाचा प्रस्ताव पाठविला असताना ठाणे येथील विभागीय व्यवस्थापकाला सुवर्ण पदकाने गौरविण्यात आले आहे. याप्रकरणी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे विविध कर्मचारी संघटनांनी तक्रार केली आहे.

ठाणे येथील वन प्रकल्पाचे विभागीय व्यवस्थापक योगेश टीकाराम वाघाये यांनी वन उत्पादनात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना 'सुवर्ण' पदकाने वनमंत्री गणेश नाईक, वन विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, वन विभागाच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता बिश्वास आदींच्या हस्ते गौरविण्यात आले आहे. मात्र, डीएम योगेश वाघाये यांनी सुवर्णपदक मिळविण्यासाठी आपल्या नावाची घुसखोरी केली, अशी तक्रार वन कामगार संघटनेने २१ मे २०२५ रोजी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे तक्रार केली आहे. डीएम वाघाये यांच्यावर अपहार, भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप असताना शासनाकडून पदकांनी कसे गौरविले जाते, असा सवाल राज्य वनविकास महामंडळ अधिकारी व कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष बी. बी. पाटील यांनी ८ मे रोजी वनमंत्री गणेश नाईक यांना पाठविलेल्या पत्राद्वारे उपस्थित केला आहे. योगेश वाघाये यांचे नाव पदकांच्या यादीत कुणी, कसे घुसविले याप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## राज्यात अनुसूचित जमातींच्या पदभरतीकडे शासनाचे दुर्लक्ष

### रिकामी केली ६ हजार ८१० अन् भरली केवळ १ हजार ३४३ पदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राज्यातील शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापनांवरील अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेली तब्बल १२ हजार ५२० पदे खोट्या आदिवासी जातप्रमाणपत्रांच्या आधारे गैरआदिवासी उमेदवारांनी बळकावल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ६ जुलै २०१७ रोजी या संदर्भात ऐतिहासिक निर्णय दिला होता. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने २१ डिसेंबर २०१९ रोजी शासन निर्णय काढून ही सर्व पदे ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत रिक्त करून नव्याने भरावीत, स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, अद्याप फक्त ६ हजार ८१० पदेच रिकामी करण्यात आली असून, त्यापैकी केवळ १ हजार ३४३ पदांचीच नव्याने भरती झाली आहे. या पार्श्वभूमीवर 'आफ्रोट' या सामाजिक संघटनेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका (क्र. ३१४०/२०१८) दाखल केली होती. याचिकेच्या सुनावणीदरम्यान राज्यात शासकीय व निमशासकीय सेवेत आदिवासींकरिता राखीव असलेली तब्बल १२ हजार ५२० पदे गैरआदिवासींनी खोटे जातप्रमाणपत्र सादर करून बळकावली असल्याचे प्रतिज्ञापत्र खुद्द राज्य शासनानेच दिले होते.२०२१ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तत्कालीन आमदार डॉ. संदीप धुर्वे यांनी २ मार्च २०२१ रोजी तारांकित प्रश्न विचारला होता. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रश्नाला उत्तर देत सन २०२१ पर्यंत आदिवासी उमेदवारांची विशेष पदभरती करण्यात येईल, अशी लेखी हमी विधिमंडळात दिली होती.

१० मार्च २०२२ रोजी विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यावर विशेष चर्चा झाली. या चर्चेला सामान्य प्रशासन विभागाचे तत्कालीन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी उत्तर देऊन आदिवासी समाजाची विशेष भरती मोहीम राबविणार असल्याची सभागृहात घोषणा केली होती, हे विशेष.

## संदीप क्षीरसागर यांच्या विरोधात गंभीर आरोप

### प्रशासनातील अधिकारीही घरगडी असल्याची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९बीड**

बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्याविरोधात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर जोरदार आंदोलन छेडले आहे. आमदार क्षीरसागर यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांची विकासकामे हेतुपुरस्सरपणे रोखल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.



सन २०१९ पासून आमदार क्षीरसागर कोट्यवधी रुपयांची टक्केवारी घेऊन कामांमध्ये अडथळा निर्माण करत असल्याचा थेट आरोपही स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला. ते केवळ तोडपाणी मिळवण्यासाठी कामे थांबवत असून, ही बाब उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी हे आंदोलन केले जात असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि विकासकामांमध्ये जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणाऱ्या कामांना अडथळा आणला जात असल्याचा आरोपही करण्यात आला. विशेष म्हणजे, हे आरोप केवळ आमदारांवरच नव्हे तर काही प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही केले गेले आहेत.

आंदोलकांनी आरोप केला की, पीडब्ल्यूडीचे कार्यकारी अभियंता तोंडे, उपअभियंता बोराडे आणि कनिष्ठ अभियंता ठाकूर हे अधिकारी आमदार क्षीरसागर यांच्या प्रभावाखाली असून, त्यांना पालकमंत्री किंवा इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे फोन आले तरीही ते कोणतेही काम ऐकत नाहीत. हे अधिकारी आमदारांच्या घरगडीप्रमाणे वागत असल्याचा गंभीर आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

## संपादकीय ......

# शिवराज्याभिषेक : सार्वभौम राज्याची स्थापना

शिवराज्याभिषेक ही इतिहासातील एक महान क्रांतिकारी, ऐतिहासिक आणि प्रेरणादायक घटना आहे. मध्ययुगीन काळात राज्यकारभार करणे, पत्रव्यवहार, तह, करार, न्यायदान, चलन व्यवस्था, कृषी कायदे, करप्रणाली, संरक्षण, दळणवळण आदी कामांसाठी राज्याभिषेक अत्यावश्यक होता. जोपर्यंत राज्याभिषेक नव्हता, तोपर्यंत शिवरायांनाही सरदाराचा पुत्र, जमीनदार, वतनदार, असेच समजले जात असे. शिवराज्याभिषेकाने स्वातंत्र्याचा अरुणोदय झाला. सार्वभौम राज्य स्थापन झाले.

भारतात आज आपण संसदीय लोकशाहीत आहोत. आपल्याला संविधानाने अनेक हक्क, अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे. तसेच, विहित अटी पूर्ण करणाऱ्यांना निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार आहे. त्यामुळे आपल्या देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रिपदी कोणत्याही जाती-धर्माचा व्यक्ती लोकशाही मार्गाने निवडला जातो. विद्यमान नेतृत्व हे वंशपरंपरेने नव्हे, तर कर्तृत्वाने आणि लोकनियुक्त आहे; पण मध्ययुगीन काळात अशी परिस्थिती नव्हती. भूमिपुत्रांनी राज्याभिषेक करणे, राजा होणे, नेतृत्व करणे ही संकल्पना खूप कठीण होती. येथील कष्टकरी, श्रमकरी, शेतकरी, अस्पृश्य जातींना केवळ कष्ट करायचे, लढायचे; पण प्रतिनिधित्वाचे स्वप्न पाहावयाचे नाही, हा तो काळ होता. अशा काळात छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक करतात, ही एक महान क्रांतिकारी, ऐतिहासिक आणि प्रेरणादायक घटना आहे.राज्याभिषेक ही दबलेल्या, नाउमेद झालेल्या, पिचलेल्या, हताश झालेल्या एतद्देशीयांना नवचैतन्य देणारी घटना आहे. आपण लढू शकतो, आपण जिंकू शकतो आणि आपण उत्तम प्रकारे राज्यकारभार करू शकतो, ही प्रेरणा नाउमेद झालेल्या भारतीयांच्या मनात शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने निर्माण केली. सभोवताली मोगल, आदिलशहा, पोर्तुगीज, इंग्रज, कुतुबशहा राज्य करत होते; पण तो अधिकार एतद्देशीयांना नव्हता. तो महत्प्रयासाने मिळविण्याचे क्रांतिकारक कार्य छत्रपती शिवाजीराजांनी केले. त्यामुळे त्यांचा समकालीन असणारा कृष्णाजी अनंत सभासद सांगतो, हा मराठा पातशहा एवढा छत्रपती झाला ही गोष्ट काही सामान्य झाली नाही. अर्थात, शिवराज्याभिषेक ही घटना असामान्य आहे, असे सभासद म्हणतो.छत्रपती शिवाजीराजांनी राज्याभिषेकाचा निर्णय घेतला. त्यांच्या राज्याभिषेकाला अनेक अडचणी आल्या. त्यावर त्यांनी मात केली. त्यांच्या कणखर आणि दूरदृष्टीच्या मातोश्री जिजाऊ माँसाहेब त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. जिजाऊंनी त्यांच्या खासगी खर्चाची २५ लाख पगोडा रक्कम राज्याभिषेकप्रसंगी स्वराज्यासाठी शिवाजी महाराजांकडे सुपूर्द केली. स्वराज्य स्थापनेसाठी अनेक अडचणी आल्या; पण शिवाजीराजे संकटसमयी लढणारे होते. रात्रंदिन काबाडकष्ट करणाऱ्या मावळ्यांनी स्वराज्यासाठी घाम गाळला, रक्त सांडले. राज्याभिषेकाच्या प्रसंगाचे वर्णन प्रत्यक्षदर्शी कृष्णाजी अनंत सभासद यांनी रसाळ, लालित्यपूर्ण भाषेत केलेले आहे. ते म्हणतात की, वाराणसीचे पंडित गागाभट्ट हे शिवराज्याभिषेकासाठी आले. शिवाजीराजांनी चार पातशहा जिंकल्या. अनेक किल्ले जिंकले. पाऊण लाख घोडा लष्कर निर्मिले, त्यामुळे त्यांना राज्याभिषेक व्हावा, त्यासाठी पूर्ण नियोजन केले. अनेक मातब्बर लोक बोलावले. बत्तीस मण सोन्याचे सिंहासन निर्मिले. ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक रायगडावर यथाविधी पार पडला.

राज्याभिषेकाचे वस्तुनिष्ठ वर्णन करणारा दुसरा महत्त्वाचा प्रत्यक्षदर्शी म्हणजे इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्सेंडेन होय. हा राज्याभिषेकाला रायगडावर हजर होता. तो लिहितो, ६ जूनला सकाळी सात किंवा आठच्या सुमारास मी दरबारात गेलो. शिवाजीराजे एका भव्य सिंहासनावर बसले होते. सरदार, अधिकारी, प्रतिनिधी त्यांच्या समोर बसले होते. पुत्र संभाजीराजे व इतर मंत्री मानानुसार स्थानापन्न झाले होते. शिवाजीराजांनी हेन्रीला व नारायण शेणवीला जवळ बोलावले. शिवाजीराजांना मुजरा करून हिऱ्याची अंगठी भेट दिली त्या प्रसंगाचे व त्या ठिकाणी केलेल्या सजावटीचे इथंभूत वर्णन हेन्री ऑक्सेंडेनने केलेले आहे. राज्याभिषेकावेळी रायगडावर हत्ती, घोडे कसे आणले असतील? याचे आश्चर्य हेन्री व्यक्त करतो. अर्ध्या जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांनाही आश्चर्य वाटावे आणि त्यांनी रायगडावर येऊन शिवरायांना मुजरा करावा, हे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व आहे. राज्याभिषेकाने शिवाजी महाराज अधिकृत राजा झाले. ते छत्रपती झाले. राज्यकारभार करण्याचा त्यांना अधिकार मिळाला. राज्याभिषेकाने त्यांना जागतिकस्तरावर मान्यता मिळाली. रयतेला राजा मिळाला. शेकडो वर्षांची गुलामगिरी नष्ट झाली. हा राजकीय स्वातंत्र्याचा उद्घोष होता. नाउमेद झालेल्या प्रजेला राज्यकर्ता होण्याचा आत्मविश्वास राज्याभिषेकाने मिळाला. राज्याभिषेकानंतर शिवाजीराजांनी स्वतःचा शिवशक सुरू केला. राज्याभिषेकाने शिवाजी महाराज शककर्ते झाले. त्यांनी स्वतःची चलन व्यवस्था सुरू केली. सोन्याचे होन व तांब्याची शिवराई ही त्यांची चलन व्यवस्था होती. आधुनिक लोकशाहीचा पाया या शिवराज्याभिषेकात आहे. आपले राज्य, आपला राजा, आपले चलन, आपली संहिता, आपले निर्णय, आपली संस्कृती हे केवळ राज्याभिषेकानेच शक्य झाले.शिवराज्याभिषेकाचा रयतेला आनंद झाला. मातोश्री जिजाऊ कृतार्थ झाल्या. शहाजीराजे-जिजाऊंनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. मावळ्यांच्या त्यागातून हा सुवर्णक्षण पाहता आला. या राज्याभिषेकाला एकूण एक करोड बेचाळीस लाख होन इतका खर्च झाला, असे सभासद सांगतात. हा पहिला राज्याभिषेक होय. त्यानंतर २४ सप्टेंबर १६७४ रोजी शिवरायांनी तांत्रिक पद्धतीने राज्याभिषेक केला. यामध्ये संस्कृत विद्वान असणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. या राज्याभिषेकाचे पौरोहित्य निश्चलपुरी यांनी केले. हा दुसरा राज्याभिषेक होता. शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकासाठी रायगड निवडला; कारण हा किल्ला सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण आहे. शिवाजी महाराजांनी धार्मिक, राजकीय, भौगोलिक परिस्थितीचा यथायोग्य अभ्यास करून राज्याभिषेक सोहळा पार पाडला.

# मानवाधिकार असोसिएशनच्या तालुकाध्यक्षपदी मोहोड

## बाल कामगारांचा प्रश्न उचलणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ अचलपूर**

अंतरराष्ट्रीय मानव अधिकार वेलफेअर असोसिएशनच्या अचलपूर तालुका अध्यक्षपदी किशोर मोहोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यांचे सामाजिक कार्याची दखल घेऊन गणेश वाघचोरे डायरेक्टर मुंबई यांनी एका पत्राद्वारे त्यांची नियुक्ती केली

यापूर्वी मोहोड यांनी अचलपूर नगर परिषदेतील एक कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार उघडकीला आणला असून त्याचा ते पाठपुरावा करीत आहे त्यांच्या नियुक्ती बद्दल समीर परब जनसंपर्क अधिकारी मुंबई संजय चौबितकर राष्ट्रीय कार्याध्यक्ष अनिल सोनपरोते राष्ट्रीय कार्यकारी सदस्य सुनील भोरे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेंद्र निंबेकर ,गौरव डकरे अनिल तायडे यांचे सह आदींनी त्यांच्या अभिनंदन केले आहे

अचलपूर परतवाड्यात वीट भट्ट्या बांधकाम उपहारगृहे किंवा एखादया समारंभात आदी ठिकाणी बालकामगार सर्रास काम करताना दिसतात त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे याबद्दल आपण आवाज उचलणार आहे तसेच ज्या ज्या ठिकाणी मानव अधिकाराचे हनन झालेले दिसेल त्या प्रकरणांना आता आम्ही वाचा फोडणार

– **किशोर मोहोड** नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष मानवाधिकार वेल्फेअरसोसायटी

# मासेमारी करतानाच मगरीच्या हल्ल्यात युवकाचा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९गडचिरोली :** मासेमारीसाठी इंद्रावती नदीत सहकाऱ्यांसह गेलेल्या युवकावर मगरीने हल्ला करून त्याला ठार केले. ही घटना महाराष्ट्र – छत्तीसगड राज्याच्या सीमेलगत सिरोंचा तालुक्याच्या इंद्रावती नदीत शनिवार, ७ जून रोजी दुपारी २:०० वाजेच्या सुमारास घडली. समित अंबाला (२२, रा. अटूकपल्ली, जिल्हा बिजापूर, छत्तीसगड) असे मृत युवकाचे नाव आहे. सिरोंचा तालुका व छत्तीसगड राज्याच्या सीमेला लागूनच इंद्रावती नदी वाहते. सिरोंचा तालुक्याच्या हद्दीत सोमनपल्ली हे गाव आहे. दुसऱ्या बाजूला छत्तीसगड राज्यातील अटूकपल्ली हे गाव आहे. समित अंबाला हा युवक नेहमीप्रमाणे मासे पकडण्यासाठी नदीकाठी गेला होता. नदीत जाळे टाकत असताना अचानक मगरीने त्याच्यावर हल्ला केला. मगरीने त्याचा उजवा पाय पकडून पाण्यात ओढले.




# हृदयाचं आरोग्य हळूहळू बिघडवतात हे ५ पदार्थ; तुम्ही दररोज खात असाल तर त्वरित टाळा

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्या शरीरासाठी हृदय किती महत्वाचे आहे, हे सर्वांनाच माहिती असेल. हृदय आपल्याला निरोगी आणि जिवंत ठेवण्यासाठी २४ तास काम करते. संपूर्ण शरीराला पंपासारखं काम करत ऑक्सिजनयुक्त रक्त आणि पोषक तत्वे पोहोचवते. जर हृदयाचे आरोग्य चांगले असेल तर शरीराचे सर्व अवयव व्यवस्थीत काम करतात. शिवाय दीर्घकाळ जगू शकतो. तुमचे हृदय तुमच्यासाठी सतत काम करत असते, त्या बदल्यात तुम्ही ते निरोगी देखील ठेवले पाहिजे.जर तुम्हाला त्याचे महत्त्व माहीत असेल आणि तरीही तुम्ही चुकीचा आहार, बैठी जीवनशैली आणि कमी झोप घेत असाल तर, यामुळे तुम्ही अनेक प्रकारच्या आजारांना आमंत्रण देत आहात. तुम्ही जे पदार्थ खाता ते हृदयाच्या आरोग्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. हृदय निरोगी ठेवण्यासाठी तुमचा आहार निरोगी असणे खूप महत्वाचे आहे. तसेच, कोणते पदार्थ हृदयाच्या आरोग्याला हानी पोहोचवतात हे माहित असणे महत्त्वाचे आहे. आज अशा ५ पदार्थांबद्दल जाणून घ्या जे तुमच्या हृदयाला हानीकारक ठरतात.

**प्रक्रिया केलेले मांस**– हार्वर्ड हेल्थच्या मते, हृदय निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही प्रक्रिया केलेले मांस खाणे टाळले पाहिजे. सलामी, हॉट डॉग, सॉसेज आणि डेली मीट सारख्या प्रक्रिया केलेल्या मांसामध्ये सोडियम आणि संतृप्त चरबीचे प्रमाण जास्त असते. म्हणूनच ते हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक असतात.

**तळलेले पदार्थ** तुम्ही आहारातून तळलेले पदार्थ कमी प्रमाणात खाल्ले पाहिजेत. खरं तर, तळलेल्या पदार्थांमध्ये खूप जास्त कॅलरीज असते. या पदार्थांचे जास्त सेवन केल्याने उच्च रक्तदाब, मधुमेह आणि लठ्ठपणाचा धोका वाढतो, जे सर्व हृदयासाठी हानिकारक आहेत. तुमच्या आहारात संतृप्त चरबीऐवजी निरोगी असंतृप्त चरबी असलेल्या पदार्थांचा वापर करण्याचा प्रयत्न करा. असंतृप्त चरबी समुद्री खाद्यपदार्थ, काजू, बिया, ॲव्होकॅडो आणि तेलांमध्ये आढळू शकतात. स्वयंपाकासाठी उपयुक्त तेलांमध्ये



मोनोअनसॅच्युरेटेड आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्स जास्त असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी सर्वोत्तम असतात. पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्सच्या आहारातील स्रोतांमध्ये सोयाबीन, कॉर्न, करडई आणि सूर्यफूल तेले यांसारखी वनस्पती तेले समाविष्ट आहेत. मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्सच्या प्रमुख वनस्पती स्रोतांमध्ये कॅनोला आणि ऑलिव्ह तेल आणि उच्च ओलिक ॲसिड असलेले करडई आणि सूर्यफूल तेले समाविष्ट आहेत.

**लोणी**– जर तुम्हाला लोणी आवडत असेल, तर हे थोडे धक्कादायक असू शकते, परंतु सत्य हे आहे की ते तुमच्या हृदयासाठी एक भयानक आहे. लोण्यात संतृप्त चरबीचे प्रमाण जास्त असते, जे उच्च कोलेस्टेरॉल पातळी वाढवते.

**मद्यपान**– मद्यपान टाळणे हा तुमचे हृदय निरोगी ठेवण्याचा एक उत्तम मार्ग आहे. नियमितपणे जास्त प्रमाणात मद्यपान केल्याने लठ्ठपणा, उच्च रक्तदाब आणि स्ट्रोकचा धोका वाढू शकतो, जे हृदयासाठी धोकादायक घटक आहेत.

साखरेचे प्रमाण जास्त असलेले पदार्थ

जसे काही पदार्थ तुमच्या हृदयाच्या आरोग्याला फायदेशीर ठरू शकतात तसे काही पदार्थ हृदयरोगाला धोका ठरू शकतात. साखरेचे प्रमाण जास्त असलेले पदार्थ, हृदयाच्या आरोग्यासाठी टाळले पाहिजेत.

# पेरणीपूर्वी सोयाबीनवर बीजप्रक्रिया करा अन् खोडमाशीला रोखा!

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**

विदर्भात सोयाबिन पिकाची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. पेरणीनंतर प्रामुख्याने खोड माशीचा रोपावस्थेत प्रादुर्भाव होत असल्यामुळे हंगामाच्या सुरुवातीपासुनव या किडीच्या व्यवस्थापणासाठी बिज प्रक्रिया करूनव लागवड करावी. या किडीचा प्रादुर्भाव पिकाचे रोपावस्थेपासुनच म्हणजेच रोप १० ते १५ दिवसाचे झाल्यानंतर होतो. त्यामुळे त्याचा संख्येवर विपरीत परिणाम होऊन पिकाची दुबार पेरणीची शक्यता असते. मात्र बिजप्रक्रिया केल्यास सोयाबीनचे पिक जवळपास २५ ते ३० दिवसपर्यंत या किडीस कमी प्रमाणात बळी पडते.

**किडीचा जिवनक्रम व नुकसानीचा प्रकार**

खोड माशी लहान, चमकदार काळया रंगाची असुन त्यांची लांबी २ मि.मि. असते.

अंडयातुन निघालेली अळी पाय नसलेली, फिक्कट पिवळया रंगाची, २-४ मि.मि. लांब असते.

ही अळी प्रथम जवळच्या पानाच्या शिरेला छिद्र करते.

अळीनंतर पानाचे देठातुन



झाडाचे मुख्य खोडात किंवा फांदीत प्रवेश करुन आतील भाग पोखरुन खाते.

प्रादूर्भावग्रस्त खोड चिरून पाहील्यास परिक्या रंगाची अळी किंवा कोषला लसर नागमोडी भागात दिसते.

खोडमाशीचा प्रादुर्भाव पिकाचे सुरुवातीचे अवस्थेत झाल्यास किडग्रस्त झाड वाळते व मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

मोठ्या रोपावर असा परिणाम दिसत नाही, परंतु अशा रोपावर खोडमाशीचे अळीचे प्रौढमाशीला बाहेर येण्यासाठी केलेले छिद्र आढळते.

खोडमाशीची डाळी तसेचकोष फांद्यात, खोडात असतो.

अशा किडग्रास्त रोपावरील



फुलांची गळ होते व शेंगातील दाण्याचे वनज कमी होऊन उत्पादनात १६-३० टक्के घट होते.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**असे करा व्यवस्थापन**

१. थायोमेथोक्झाम ३० टक्के एफ एस १० मिली / १ कि बियाणे बिजप्रबिक्रीया करूनच पेरणी करावी. त्यामुळे सुरुवातीच्या २५ ते ३० दिवस सोयबीन पिक खोड माशी या किडीच्या प्रादुर्भावापासुन मुक्त राहते.

२. बिज प्रक्रिया करतांना सर्वप्रथम रासायनिक बुरशीनाशकाची बिज प्रक्रिया करावी. त्यानंतर रासायनिक किटकनाशकाची व सर्वात शेवटी जैविक बुरशीनाशक व जैविक संर्वधकाची बिज प्रक्रिया करावी.

३. सोयाबीन पिकामधे उगवणीनंतर आठ ते दहा दिवसानंतर पिवळे चिकट सापळे लावून नियमित खोडमाशीच्या प्रादुर्भावर लक्ष ठेवावे (२५/हे.).

४. ज्या ठिकाणी काही कारणा अभावी सोयाबीन बियाण्यास थायोमेथोक्झामची बिजप्रक्रिया केली नसल्यास सोयाबीनचे पिक १५ दिवसाचे झाल्यानंतर इथियॉन ५० टक्के ३० मिली किंवा इंडोक्राकार्य १५.८ टक्के ७.५ मिली किंवा क्लोरेंट्रेभिप्रोल १८.५ टक्के ३.० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

या किडीच्या वाढीसाठी उष्म तपमान जास्त आर्द्रता, भारीपाऊस व त्यानंतर कोरडे वातावरण पोषक आहे. असे वातावरण आढळल्सास शेतकरी बांधवांनी आपल्या सोयाबिन पिको नियमित सर्वेक्षण करून सतर्क राहून नियंत्रणाचे उपाय योजावेत.

– डॉ. डी. बी. उंदिरवाडे, विभाग प्रमुख किटकशास्त्र विभाग, पंदेकृवि, अकोला.

# खंडणीतूनच हा खून झाल्याचे सिद्ध झालेयः आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी

## वाल्मीक कराडची दोषमुक्ती नको



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९बीड**– बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी वाल्मीक कराड व सहकाऱ्यांवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच वाल्मीक कराडला मकोकातून दोषमुक्त करण्यात यावे, अशी मागणी कराडच्या वकिलांकडून करण्यात आली होती. आता या प्रकरणी फिर्यादींनी देखील आपले म्हणणे न्यायालयात अर्जाद्वारे मांडले आहे, अशी माहिती धनंजय देशमुख यांनी दिली आहे.

धनंजय देशमुख यांनी न्यायालयात सादर केलेल्या अर्जात असे म्हटले आहे की, सीआयडी, एसआयटीकडून दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. त्यात खंडणी ते खून हे दोन्ही प्रकरणे एकत्रित आहेत. त्यामुळे खंडणीतूनच हा खून झाल्याचे सिद्ध झाले आहे. या आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे अर्जात म्हटले आहे.

तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणात गुंतलेल्या या सगळ्या आरोपींना फाशीची शिक्षा होणार आहे, यातून कोणीच सुटणार नाही.

आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना देखील काठोरातील कठोर शिक्षा व्हावी, असे धनंजय देशमुख यांनी म्हटले आहे.

### १७ तारखेला पुढील सुनावणी होणार

दरम्यान, विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी विशेष मकोका न्यायालयात अर्ज दाखल केला असून या अर्जावर १७ तारखेला सुनावणी होणार आहे. मकोका कायद्यांतर्गत असणाऱ्या काही कलमात आरोपीच्या संपत्तीची जप्ती करता येते. त्यानुसार आता १७ तारखेला कराडच्या संपत्तीच्या जप्तीवर काय निकाल समोर येतो तसेच मकोका मधून दोषमुक्त करण्याच्या अर्जावर न्यायालयात काय सुनावणी होते याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सोमवार दि. ९ जून २०२५

शहर/ग्रामिण


# जिल्हाधिकाऱ्यांचा पहिला दोन दिवसांचा दौरा मेळघाटात

## मेळघाटात विविध विकास योजनांचा घेतला आढावा





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आपला जिल्ह्यातील पहिलाच दोन दिवसांचा दौरा दुर्गम मेळघाटातील धारणी तालुक्यात केला. या दौऱ्यात त्यांनी आदिवासी विकास, आरोग्य सेवा आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला. त्यांच्या या दौऱ्यामुळे स्थानिक प्रशासनाला विकासाची दिशा मिळाली आहे.दौऱ्यात आदिवासी विकास विभागांतर्गत प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. या सभेत जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम, शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, नामांकित आश्रमशाळेतील प्रवेश तसेच इतर विविध योजनांवरील कामकाजाची माहिती घेण्यात आली. सर्व शासकीय योजनांचे लाभ तळागाळातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सूचना दिल्या.धारणी प्रकल्प कार्यालय येथे जिल्हाधिकारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या तिथीनिमित्ताने प्रतिमा पूजन करून मानवंदना अर्पण केली. त्यांनी शिवराज्याभिषेकाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांना प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.त्यानंतर त्यांनी धारणी तहसील कार्यालय येथे भेट देऊन पाहणी केली. नैसर्गिक आपत्तीमधील बाधित शेतकऱ्यांच्या ई–केवायसी आणि ग्रीस्टॅक नोंदणीविषयी संपूर्ण प्रक्रियेची माहिती घेतली. तसेच धारणी उपजिल्हा रुग्णालय येथे भेट देऊन जिल्हाधिकाऱ्यांनी अत्याधुनिक रक्तपेढीचे निरीक्षण केले आणि नवीन इमारतीची पाहणी केली. आरोग्य सेवांच्या दर्जाबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये दाखल असलेल्या कुपोषित बालकांच्या कुटुंबासोबत संवाद साधला.उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित 'सुसंवाद' कार्यक्रमात जिल्हाधिकाऱ्यांनी आशा सेविकांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा सेविकांचा सत्कार केला. त्यांनी आरोग्य क्षेत्रातील त्यांच्या भूमिकेचे कौतुक करत, विविध अडचणींबाबत सूचना ऐकून घेतल्या.

त्यानंतर धारणी येथील नवीन प्रशासकीय इमारत येथे वन विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत वृक्षारोपण केले.दौऱ्यामध्ये उपवनसंरक्षक अग्रीम सैनी, विभागीय वनाधिकारी यशवंत बाहाळे, तहसीलदार प्रदीप शेवाळे, गट विकास अधिकारी विजय गायकवाड, प्रकल्प अधिकारी राहुल ठोंबरे, मुख्याधिकारी राजेश माळी आदी उपस्थित होते.–

# सीईओ संजीता महापात्र यांना 'स्कॉच अवॉर्ड'

## मिशन मेळघाट २८ उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीची राष्ट्रीय पातळीवर दखल




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांना या वर्षाचा प्रतिष्ठेचा स्कॉच अवॉर्ड प्राप्त झाला आहे. हे पारितोषिक त्यांना मेळघाटमधील कुपोषण, बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्यासाठी राबवलेल्या 'मिशन मेळघाट २८' या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी प्रदान करण्यात आले आहे.

जानेवारी २०२२ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे धारणी आणि चिखलदरा तालुक्यांतील कुपोषणाचे प्रमाण कमी झाले असून संस्थात्मक प्रसूतीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचा थेट परिणाम म्हणून २०२२ पासून आई व बाळाच्या मृत्यूच्या घटनांमध्ये घट झाली आहे.

मिशन मेळघाट २८ या उपक्रमाची नोंद देशभरातून निवडलेल्या १००० प्रकल्पांपैकी एक म्हणून झाली. या प्रकल्पाचे पहिले सादरीकरण २६ मार्च रोजी सीईओ संजीता महापात्र यांनी स्कॉच ज्यूरी सदस्यांसमोर यशस्वीपणे सादर केले. त्यानंतर 'ऑर्डर ऑफ मेरीट' साठीची रेटिंग प्रक्रिया पार पडली, ज्यातून ५० प्रकल्पांची सेमी फायनल साठी निवड झाली.

६ जून रोजी अंतिम सादरीकरणात देशभरातून निवडलेल्या २० उत्कृष्ट प्रकल्पांमध्ये मिशन मेळघाट २८ ची निवड झाली आणि या उपक्रमासाठी संजीता महापात्र यांना स्कॉच अवॉर्ड जाहीर करण्यात आला.स्कॉच अवॉर्ड हा देशासाठी योगदान देणाऱ्या नामवंत व्यक्तींना दिला जाणारा पुरस्कार आहे. पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण, डिजिटल टेक्नोलॉजी आणि जिल्हा प्रशासन आदी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना या पुरस्काराने गौरविण्यात येते.

सीईओ संजीता महापात्र यांच्या दूरदृष्टी, प्रयत्नशीलता आणि सामाजिक बांधिलकीची ही राष्ट्रीय स्तरावर मिळालेली पावती आहे. अमरावती जिल्ह्याच्या नावावर या पुरस्कारामुळे अभिमानाची नोंद झाली आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये नवी दिल्ली येथे अर्वाड वितरण होणार आहे .त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे.–

# प्रत्येकी दोन हजार रुपये घेऊनही १० हजारांवर शिक्षक प्रशिक्षणापासून वंचित

## प्रशासकीय यंत्रणाच ढेपाळलेली, शिक्षण मंत्र्यांकडे तक्रार करणार – शेखर भोयर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** – राज्य शासनाकडून शिक्षक वेतन व निवड अशा दोनच श्रेणी दिल्या जातात. राज्य शासनाने ४० हजार शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केले. यासाठी शिक्षकांकडून २ हजार रुपये शुल्क वसूल करुनसुध्दा कुठलिही सुविधा दिल्या जात नाही. प्रशासकीय यंत्रणा ढेपाळलेली असून प्रशिक्षणात अक्षम्य चुका असल्याने १० हजारांपेक्षा अधिक शिक्षक या प्रशिक्षणापासून वंचित राहिल्याचा आरोप शिक्षक महासंघाचे चंद्रशेखर भोयर यांनी केला. या संदर्भात शिक्षण मंत्र्याकडे तक्रार करणार असल्याचे त्यांनी पत्रपरिषदेत सांगितले.राज्यातील शिक्षण व्यवस्थेतील अधिकाऱ्यांच्या गैर नियोजनाने शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर




नुकसान होत आहे. राज्यातील ग्रामीण भागात भौगोलिक परिस्थिती व ग्रामीण भागातील कुटूंबाचे रोजगार निमिर्तीसाठी होणारे स्थलांतर या कारणांमुळे वाडी, वस्ती, डोंगराळ व दुर्गम भागात उच्च प्राथमिकच्या वर्गात अनेक ठिकाणी २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्या आहे. अशा शाळेत नवीन संचमान्यता १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार पूर्वीप्रमाणे पुरेसे शिक्षक पद मंजूर न झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रात २५ हजार पेक्षा अधिक प्राथमिक शिक्षक अतिरिक्त ठरत आहे. कमी पटसंख्येच्या उच्च प्राथमिक वर्गासाठी शिक्षकाचे पद पुरेसे न दिल्याने प्राथमिक शाळेतील शिक्षकांना आधीच्या दोन ते तीन वर्गासमवेत उच्च प्राथमिकचेही अध्यापन करावे लागणार आहे. या निर्णयाची तात्काळ अमंलबजावणी करण्याची घाई करून नये तसेच या शासन निर्णयाला स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी ही त्यांनी केली.

# श्री संत गजानन महाराजांची पालखी वाशिम जिल्ह्यात दाखल



## वारकऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९वाशिम** – विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र शेगाव येथून आषाढीवारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीने आज, रविवार, ८ जून रोजी वाशिम जिल्ह्यात दिमाखात प्रवेश केला. ज्ञानोबा माऊली तुकाराम आणि गण गण गणात बोथेच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता.दि. ०२ जून रोजी शेगाव येथून राजवैभवी थाटात, ७०० हून अधिक वारकऱ्यांसह श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले होते.

भगव्या पताका खांद्यावर घेऊन, एकाच गणवेशात आणि अत्यंत शिस्तीत चालणाऱ्या वारकऱ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.वाशिम जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी पातूरच्या घाटामध्ये श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे विहंगम दृश्य टिपण्यात आले. अकोल्याचे फोटोग्राफर मोहन पाटील यांनी हे अप्रतिम दृश्य कैद केले आहे.पालखीच्या वाशिम जिल्ह्यातील आगमनामुळे वारकऱ्यांमध्ये मोठा उत्साह संचारला असून, ठिकठिकाणी पालखीचे भावपूर्ण स्वागत करण्यात येत आहे.

# मान्सून पुन्हा सक्रिय होणार; १३ जूनपासून राज्यात या ठिकाणी पुन्हा धो–धो बरसणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** –

पदार्पणातच दोन–चार शतके ठोकून विक्रमांची बरसात करणाऱ्या क्रिकेटपटूसारखा माहोल केल्यानंतर एकदम 'बॅड पॅच' आल्यासारखी मान्सूनची स्थिती झाली आहे.

२६ मे रोजी मुंबईत आणि त्यानंतर गडचिरोलीमार्गे विदर्भात दाखल झालेल्या मान्सूनने मोठा ब्रेक घेतला. १३ जूनपासून पुन्हा महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होऊन मध्यम पावसाची शक्यता आहे.

गेल्या आठ–दहा दिवसांपासून रुतून बसलेला



मान्सून खान्देश, नाशिक व विदर्भातील उत्तरेकडील जिल्ह्यांत पोहोचू शकला नाही.निम्मा महाराष्ट्राच मान्सूनने व्यापला असून, शेतकरी पेरणीसाठी सक्रिय मान्सूनच्या प्रतीक्षेत आहेत. सध्या मान्सून खान्देशसह विदर्भाच्या अलीकडेच थबकला आहे. त्याच्या पुढील प्रवासासाठी पोषक वातावरण नाही. पुढील चार दिवसही राज्यात किरकोळ पावसाची शक्यता हवामान अभ्यासकांनी वर्तविली आहे. मान्सूनच्या वाटचालीसाठी वातावरण अनुकूल आहे. मृग नक्षत्राचा पावसाची शक्यता आहे, असे अभ्यासकांना वाटते.

**राज्यात कुठे, काय शक्यता?–** ९ जूनला मुंबईसह कोकणातील ७ जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मध्यम पावसाची शक्यता आहे. नंतर १० ते १२ जूनदरम्यान पावसाचा जोर काहीसा कमी होईल. १२ जूनपर्यंत उर्वरित महाराष्ट्रातील २९ जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता आहे.

### १२४ वर्षांतील सर्वांत ओला महिना

मे महिन्याच्या उत्तरार्धात व मान्सून मुंबईत दाखल होण्याच्या काळात देशात अधिक पावसाची नोंद झाल्याचे हवामान खात्याने म्हटले होते. मे महिन्यात १२४ वर्षात प्रथमच १२६.७ मिमी पाऊस झाला.

शेतकऱ्यांनी मान्सूनच्या पावसाच्या ओलीवर व मान्सून सक्रिय झाल्यावर १५ जूननंतर चांगल्या वाफशावर पेरणीचा निर्णय घ्यावा. – माणिकराव खुळे, हवामानतज्ज्ञ.

# चांदूर रेल्वेत चार दिवसांत तीन ठिकाणी चोरी, १ लाख २७ हजारांचा ऐवज लंपास

## पोलिस अधीक्षकांनी लक्ष देण्याची नागरिकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९चांदुर रेल्वे**

चांदूर रेल्वे शहरात चोरट्यांनी अक्षरश: धुमाकूळ घातला असून दररोज कुठे ना कुठे चोरीच्या घटना घडत आहेत. पोलिस दप्तरी असलेल्या नोंदीनुसार गेल्या चार दिवसांत येथे सतत चोऱ्या झाल्या. त्यामुळे नागरिकांमध्ये दहशत पसरली असून वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी लक्ष पुरवावे, अशी मागणी पुढे आली आहे. या गोष्टींकडे खुद्द जिल्हा पोलिस अधीक्षकांनी लक्ष देण्याची गरजही त्यामुळेच निर्माण झाली आहे.

पोलिसांच्या नोंदीनुसार ४ जून रोजी रोजी पात्रीकर कॉलनी, ५ जून रोजी आठवडी बाजार व ६ जून रोजी शिक्षक कॉलनी येथे चोरीच्या घटना घडल्या आहेत. तर चांदूर रेल्वे ते पळसखेड मार्गावरील अंबापुर येथील हनुमान मंदिरात दुसऱ्यांदा चोरीचा प्रयत्न झाल्याची घटना ७ जून रोजी उघडकीस आली. अशा सततच्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सदर चोऱ्यांचे सत्र कधी थांबणार ? असा सवाल शहरवासी पोलिस विभागाला करीत आहे. त्यामुळे आता ग्रामीण पोलिस अधीक्षकांनी चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहे.

मागील दोन ते तीन महिन्यात चांदूर रेल्वे शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातल्यामुळे त्रस्त होऊन शेकडो नागरिक काही दिवसांपूर्वी स्थानिक पोलिस स्टेशनवरसुद्धा धडकले होते. यानंतर पोलिसांनी वेगाने तपासचक्रे फिरवत पती–पत्नी आरोपीला जेरबंद केले. त्यांनी शहरातील तीन चोरीच्या घटनांची कबुली दिली होती. पोलिसांनी सदर पती–पत्नी आरोपींना संपूर्ण चांदूर रेल्वे शहरातून पायदळ फिरवून नागरिकांना चोरट्यांची ओळख व्हावी, याकरिता एक



प्रकारे रॅलीच काढली होती. यानंतर चोऱ्यांना आळा बसेल असे नागरिकांना वाटत होते. परंतु आता पुन्हा चोरट्यांनी चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यात हैदोस घालायला सुरुवात केली आहे.

चांदूर रेल्वे शहरातील पात्रीकर कॉलनी परिसरातील प्रवीण इंगळे यांच्याघरी १ ते ४ जूनच्या दरम्यान चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप उघडून कपाटातील एकूण ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. त्यानंतर आठवडी बाजार परिसरातून ५ जून रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास एका ४१ वर्षीय महिलेच्या पिशवीतील नगदी ४० हजार रुपये व एक साधा मोबाईल असा एकूण ४० हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल लंपास केला. शिक्षक कॉलनी परिसरात राहणारे कमलाकर भाऊराव आखरे यांच्या घरी ६ जून रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजताच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घरी कोणी नसताना कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि कपाटातील २४ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला.

# बौद्ध समाजाच्या लग्नाची आचारसंहिता ठरवावी: नयन मोंढे

## ४ ते ५ तास उशिरा लागणारी लग्ने चिंताजनक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** बौद्ध समाजाने आता लग्न सोहळ्याची आचारसंहिता ठरवणे गरजेचे झाले आहे. नियोजित वेळेपेक्षा चार–पाच तास उशिराने लग्न लावले जात आहेत. डीजेवर नाचताना चार ते पाच तासचा वेळ व पैसा खर्च करून होणारे बेशिस्त वर्तन समाजाला अधोगतीकडे नेणारे ठरणार तेव्हा भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून बौद्ध समाजाच्या लग्नाची आचार संहिता ठरविण्यात यावी असे प्रतिपादनभारतीय बौद्ध महासभेचे अमरावती जिल्हा पर्यटन विभाग सचिव नयन मोंढे यांनी केले.भारतीय बौद्ध महासभा बडनेरा अमरावती शाखेच्या वतीने रविवारचे ३३८ वी रविवारची बुद्ध वंदना नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील ग्राम खीरसाणा येथील धम्मपद बुद्ध विहार येथे उत्साहात पार पडली.यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पर्यटन सचिव नयन मुंडे यांनी धम्मदेशनेतून उपस्थित बौद्ध उपासक उपासिका मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून रविवारच्या वंदनेचे प्रणेते तथा भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष प्रा प्रकाश बोरकर, जिल्हा संघटक आर. के. भटकर, सुरेश दहाटे, पी झेड ठवरे गुरुजी उपस्थित होते. नयन मोंढे पुढे म्हणाले की, तथागताच्या धम्माचे आचरण करणारा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित समाज घडविण्यासाठी बौद्ध उपासक उपासिकांना शिस्त पाळावीच लागले. त्यासाठी वेळेचे वर्तन आचारसंहिताही आवश्यक आहे. भारतीय बौद्ध महासभा हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेली



संघटना आहे. या संघटनेला बळ देण्यासाठी युवक महिलांनी मोठ्या संख्येने पुढे यावे व भारतीय बौद्ध महासभा घराघरात पोहोचवावी असे आवाहन केले.रविवारच्या बुद्ध बुद्ध वंदनाचे संचालन सुरेश दहाटे यांनी तर आभार रोशन मोहोड यांनी मानले. यावेळी के.डी.सांभारे, विजय बागडे, मालती मेश्राम, साहेबराव मोहोड, अशोक बनसोड, दिपक पाटील,अक्षय माहोरे,शिला माहोरे, मनोज वैद्य, उत्तम मेश्राम, पंजाबराव गेडाम, रवींद्र गेडाम, राजकन्या राउत, राजेंद्र भटकर, देवानंद बडगे,नघु माहोरे, शशीकला वैद्य, सुजाता माहोरे,शांता माहोरे, अशोक तायडे, किशोर खोब्रागडे, देवानंद बडगे, मुकुंद मेश्राम, माया बोरकर यांच्यासह खिरसाणा येथील बौद्ध उपासक उपासिका बहुसंख्येने उपस्थित होत्या.

### विहारात समाजातील विविध समस्यांवर चर्चा व्हावी: प्रकाश बोरकर

भारतीय बौद्ध महासभा रविवारच्या बुद्ध वंदने च्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश गावागत पोहचवीत आहेत. चळवळीकरिता गाव खेडे महत्वपूर्ण आहे.विवाह संस्कार आचारसंहिता होणे आवश्यक आहे. ती स्वतः पासून सुरवात करावी,विहारात वंदना केल्या नंतर ऊर्जा मिळते, तेव्हा समाजातील विविध समस्यांवर विचार विनिमय होणे आवश्यक आहे.ग्रामीण भागात सातत्याने चळवळ सुरू आहे. तथागत बुद्धांच्या मार्गावर चालल्यास जीवनाचे कल्याण होईल असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष प्रा प्रकाश बोरकर यांनी केले.–

# देशी बिजांचे रोपे तयार करून मोफत वितरण

## फेकलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या जमा करुन पर्यावरणाचा राखला समतोल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९खामगाव –** गत २८ वर्षापासून देशी बिजांचे संकलन करुन त्याचे रोपटे स्वनिर्मित रोपवाटिकेत करायचे. तर या रोपटयांसाठी प्लास्टिकच्या पिशव्या स्वतः जमा करुन आणायच्या. त्यामुळे जनावरांच्या पोटात त्या जाणार नाहीत व पर्यावरणाचा समतोलही राखल्या जाईल. यातून निर्माण झालेले रोपटे मोफत वितरण करायचे काम पर्यावरण प्रेमी संजय गुरव हे करत आहेत.

खामगावयेथील संजय गुरव हे नोकरी सांभाळून हा छंद जोपासत आहे. रोपटे तयार करण्यासाठी लागणारी कडुलिंब, साग, करंज, गोंधन, बेल, बाभूळ सिंगापूर कार्नेट, सिसम, भिंगरी, गुलमोहर, आंबा, चिंच, शिवण, सागरगोटी कांचन बहावा आदी देशी जातीचे बीज जंगल टेकड्या आदि ठिकाणी जाऊन गुरव हे संकलित करीत आहे.

या कार्यात मंगला गुरव, संदेश गुरव, श्रुती वारकड, मनोज सुळोकार, गणेश कोकाटे, गौरव इंगळे , पल्लवी चंचल, अश्विनी कल्याणी, विजय खंडागळे, संतोष डवले, राजेंद्र राजपूत, गजानन कराळे, सुभाष बोचरे, संजय वाघ, शिवाजी वाघ, वीरेंद्र शहा, चंद्रकांत केडिया, राजेश शर्मा आदींचे सहकार्य लाभले आहे आणि लाभत आहे. सहा

संजय गुरव व त्यांच्या सहकाऱ्यांनी ऊन जीवाची पर्वा न करता जंगल टेकड्यावर जाऊन वेगवेगळ्या जातीची सहा क्विंटल बीज संकलित केले आहे. संकलित केलेले हे बीज वाळवून त्याची योग्य निगा राखून वेळेवर त्याचे रोपण केले आहे. आज टेकड्यावरील झाडे पाहून मला मानसिक समाधान मिळत असल्याचे गुरव यांनी सांगितले.

घराच्या परिसरात गुरव यांनी १९९६ साली नर्सरी श्रमदानातून तयार केली. यामध्ये विशेष करून नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या झाडांबरोबरच ज्या झाडांची नागरिकांना ओळख नाही ,अशी रोपे तयार करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. दरवर्षी ते एक हजारच्या वर रोपे तयार करीत आहे. बाजारात एक किलो प्लास्टिकच्या पिशवीत खाण्याचे तेल मिळते. या पिशव्या जमा करण्यास त्यांचे प्राधान्यक्रम राहिलेले आहे. या पिशव्या वर्षभर खराब होत नाही आणि त्या सडत सुद्धा नाही हे विशेष.

# स्थलांतरित तेलाई माता मंदिराच्या जागेचा भूमिपूजन सोहळा संपन्न

## आमदार सुलभाताई संजय खोडके यांच्या हस्ते भूमिपूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** शेगाव– रहाटगाव परिसरातील दैवत असलेल्या तेलाई माताच्या स्थलांतरित नव्या मंदिराच्या जागेचा भूमिपूजनाचा सोहळा आज सकाळी पारंपरिक व धार्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. मंदिराचे जुने ठिकाण स्थानिक विकासकामांमुळे स्थलांतरित करण्यात आले असून, नव्या जागेवर नव्याने मंदिर उभारण्याचा शुभारंभ आमदार सौ सुलभाताई संजय खोडके यांच्या हस्ते भूमिपूजनाने करण्यात आला.

या भूमिपूजन सोहळ्याला परिसरातील मान्यवर,रहाटगावमधील ग्रामस्थ, भक्तगण तसेच महिला व युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पूजाविधी प्रख्यात पुजाऱ्यांच्या उपस्थितीत विधीवत पूजा श्री मनीष ठाकरे व योगिता ठाकरे यांच्याकडून पार पडली. विशेषतः गणेश पूजन, वास्तूशांती, नवग्रह पूजन आणि देवीचे आवाहन करून भूमीची शुद्धी करण्यात आली.

भूमिपूजनानंतर सर्व उपस्थितांना प्रसादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या आयोजनात रहाटगाव येथील श्री लोखंडे परिवार व तेलाई माता चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेने पुढाकार घेतला.

या प्रसंगी बोलताना, सौ. सुलभाताई यांनी सांगितले की, तेलाई माता ही या पारिसरातील आराध्य दैवत असून तिचे मंदिर नव्या ठिकाणी पूर्वीइतकीच श्रद्धा व भक्ती ठेवून उभारण्यात येणार आहे. समाजाच्या एकजुटीचे हे प्रतीक ठरेल.

मंदिराच्या नव्या बांधकामासाठी लवकरच काम सुरु होणार असून, भक्तांनी भरभरून पाठिंबा दर्शविला आहे. भविष्यात हे मंदिर केवळ धार्मिक स्थळच नव्हे, तर या भागातील सामाजिक व सांस्कृतिक एकतेचे केंद्रस्थान ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सर्व श्री यश खोडके, रामचंद्रजी गुप्ता, गुड्डू उर्फ प्रशांत भाऊ धर्माळे, रविभाऊ पंजापी, दिलीपराव लोखंडे (संचालक – तेलाई सेलेब्रेशन), अभिजीत लोखंडे,अनिल साहू, प्रणित कापडे (इंजि.), विनोदराव वडतकर (अध्यक्ष– तेलाई माता मंदिर) मनीष ठाकरे (उपाध्यक्ष), किसनराव कळंबे(सचिव), सुनील घुगे(कोषाध्यक्ष), सुनील भाऊ धर्माळे, रमेशराव गावंडे, प्रदीप निमकर, सतीश चर्जन, गजानन काळे, मंगेश नेरकर, किसनराव झिमटे, राजेंद्र राऊत, किशोर बोंद्रे, बबनराव भोंगाडे, सुरेश ठाकरे, पुंडलिकराव देशमुख, गोपाल महाराज पांडे, सतीश सावळे, सुभाष पाचपोर, उदय वानखडे, मनोज चौधरी, अशोकराव नवघरे, योगेश गावंडे, अंकुर डवरे, सुयोग पाचघरे, संतोष चांदुरकर, माणिकराव राघोर्ते, सुनील काळे, दशरथराव काळबांडे व तेलाई माता महिला भजनी मंडळ इत्यादी मान्यवर व भक्तगण उपस्थिती होते.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी अमरावती संघाची निवड

## वरिष्ठ गट पुरुष व महिला निवड चाचणी स्पर्धा उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** कबड्डी असो. विदर्भ संघ, नागपूर व अकोला महानगर कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वरिष्ठ गटातील पुरुष व महिला निवड चाचणी स्पर्धा नेहरू मैदानावरील नवरंग क्रीडा मंडळ येथे यशस्वीपणे पार पडली. या निवड चाचणीत ४० पुरुष व १५ महिला खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेतील निवडीतून तयार होणारा संघ येत्या २० ते २२ जून दरम्यान अमरावतीत होणाऱ्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत



अमरावती महानगरचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन अमरावती महानगर कबड्डी संघटनेचे अध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.उद्घाटक म्हणून माजी नगरसेवक मिलिंद बांबल उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कार्याध्यक्ष संदीप इंगोले, उपाध्यक्ष अतुल इंगोले, योगेश भोसले, कोषाध्यक्ष मिलिंद पाटील, सचिव नितीन सराफ यांच्यासह कबड्डी क्षेत्रातील मान्यवर गणेश वरुडकर, राजा गाडे, अजय पुसतकर, धनराज यादव, राजेंद्र तुळे, निलेश सराफ, संतोष चिखलकर आदी मंडळी उपस्थित होते. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंकरिता सराव शिबिर १८ व १९ जून रोजी नांदगाव पेठ येथील सप्तरंग क्रीडा मंडळाच्या मैदानावर घेण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे संचालन संदीप इंगोले यांनी तर प्रस्ताविक नितीन सराफ यांनी केले. आभार उपाध्यक्ष अतुल इंगोले यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी कबड्डी क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक स्व. बाबासाहेब भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.अमरावती महानगर कबड्डी संघटनेचे अध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी सर्व निवड झालेल्या खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# बँक ऑफ बडोदा क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने छत्रीतलावाची स्वच्छतापर्यावरण दिवसाला राबविली स्वच्छता मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती –** बँक ऑफ बडोदाच्या अमरावती क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने 'विश्व पर्यावरण दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने छत्री तलाव परिसरात स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. परिसरातील प्लास्टिक बाटल्या, पन्न्या, पाकिटे व इतर कचरा गोळा करून योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली. ही संपूर्ण मोहीम क्षेत्रीय प्रबंधक राजेश कुमार यांच्या मार्गदर्शनात पार पडली. यावेळी उपक्षेत्रीय प्रबंधक संजीव श्रीवास्तव, इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी परिसरातील प्लास्टिक कचरा संकलित करून स्वच्छतेसाठी योगदान दिले.यावेळी राजेश कुमार यांनी यावेळी सांगितले की, स्वच्छता ही आपली नैतिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचे रक्षण हे केवळ शासनाचेच नाही तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो.या उपक्रमामुळे कर्मचार्यांमध्ये पर्यावरण पूरक वर्तनाची जाणीव वाढली असून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवण्याचा निर्धार या वेळी करण्यात आला.



## सर्व शासकीय कार्यालयांत डिसेंबरपर्यंत सौर ऊर्जा वापर, मुख्यमंत्र्यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९पुणे –** राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करण्यात येणार असून, प्रधानमंत्री सूर्यघर योजना राज्यात प्रभावीपणे राबविली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. औंध येथे महाऊर्जाच्या प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.मुख्यमंत्री म्हणाले की, महाऊर्जासाठी दोन मोठी उद्दिष्टे निश्चित केली आहेत. सर्व शासकीय कार्यालये सौर ऊर्जेवर आणणे आणि प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून प्रथम



टप्प्यात १०० युनिट व दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतच्या ग्राहकांना सौर ऊर्जेवर आणणे. तसेच दरमहा ३०० युनिटपर्यंत वीज वापर करणाऱ्यांचे देयक शून्यावर आणण्याचा प्रयत्न असून, महाऊर्जा या उद्दिष्टांवर काम करेल. २० वर्षांत वीजदर सरासरी ९ टक्क्यांनी वाढले असल्याकडे लक्ष वेधून मुख्यमंत्री म्हणाले की, २०२५ ते २०३० दरम्यान वीजदर कमी करण्याचा प्रयत्न आहे. दोन वर्षांत देशभरात ४ लाख सौर कृषिपंप बसविण्यात आले असून, महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे, असे सांगत मुख्यमंत्री म्हणाले,

# लालफीतशाहीचा कारभार: पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना कागदावर

## २३४ पैकी १६० कामे पूर्ण; संपूर्ण कामे होण्याची प्रक्रिया तूर्तास संथ गतीने सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अकोला–** सध्या जून महिन्यातही उकाडा असून, अनेक ठिकाणी पाणी टंचाई आहेत. मात्र असे असले तरी यांनी मंजूर केलेल्या पाणीटंचाई निवारणाच्या २३४ उपाययोजनांपैकी १६० कामे पूर्ण झाली आहेत. अन्य कामे प्रगतीपथावर आहेत. एकूणच संपूर्ण कामे पूर्ण होण्याची प्रक्रिया तूर्तास तरी कागदावरच आहेत.उन्हाळ्यात जिल्ह्यातील सातही तालुक्यातील ग्रामस्थांना पाणी टंचाईचे चटके सोसावे लागले. काही ठिकाणी तर २–३ कि.मी.पर्यंतही पायपीट करुन पाणी आणावे लागले. अनेक ठिकाणी तर पिण्याचे शुद्ध पाणी विकत घ्यावे लागले. मजुरीसाठी फिरावे की पाण्यासाठी भटकंती करावी, असा प्रश्न ग्रामस्थांना पडला. सध्या जून महिन्यातही उकाडा वाढला असून, अनेक ठिकाणी पाणी टंचाईच्या झळा ग्रामस्थांना सोसाव्या लागत आहेत.पिण्यासाठी सहज पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने पाणीटंचाई निवारण कृती आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने जिल्ह्यातील ४१५ गावांत पाणीटंचाई सदृश स्थिती असल्याचे प्रस्तावित केले होते. या गावांतील नागरिकांसाठी ३७१ उपाययोजना सुद्धा प्रस्तावित केल्या. प्रस्तावित उपाययोजनांपैकी



जिल्हाधिकाऱ्यांनी २०३ गावांसाठी २३४ उपाययोजनांना प्रशासकीय मंजुरी दिली. त्यामध्ये नळ योजना विशेष दुरूस्ती, विंधन विहिर, तात्पुरत्या पूरक नळयोजना, विहिर अधिग्रहण व कूपनलिकेच्या योजनांचा समावेश आहे. सदर योजनांना मंजुरी दिल्यानंतर काही योजना वेळेत पूर्ण करण्याचे लेखी आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले होते. तीव्र उन्हाळा संपत असून पावसाळ्याला सुरुवात होत असतानाच मंजुरी प्राप्त उपाययोजना अपूर्ण आहेत.

**कामांना २० जूनची डेडलाईन :**कूपनलिका व विंधन विहिरींच्या उपाययोजनांची कामे २० जूनपर्यंत किंवा त्यापूर्वी पूर्ण करून त्याद्वारे प्रत्यक्ष पाणी पुरवठा करण्यात यावा. योजनेचे काम पूर्ण होताच त्याबाबत कार्यालयास कळवण्यात आहे.

आंदोलनानंतर झाले काम सुरू : अकोला तालुक्यातील गावांना ६४ खेडी खांबोरा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून पुरवठा होतो. मात्र अनेक ठिकाणी गळतीसह अन्य कारणांमुळे नियमित पाणी पुरवठा होत नाही. यापूर्वी अनेकदा ग्रामस्थ आंदोलनही करतात. योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्चही केले. ही योजना जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून चालवण्यात येत असून, देखभाल, दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून होते. काही दिवसांपूर्वी शिवसेनेचा ठाकरे गट व मजलापूर परिसरातील ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा ठिय्या आंदोलन केले होते. त्यानंतर जलवाहिनी टाकण्याचे काम सुरु झाले आहे. मात्र आंदोलन केल्याने गुन्हे दाखल करण्यात आले होते.

पूर्ण झालेल्या उपाययोजनांमुळे १३६ गावातील ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे. पाणी टंचाईच्या उपाययोजना प्रगतीपथावर असून त्यामुळे ६७ गावातील ग्रामस्थांना पाणी टंचाईपासून दिलासा मिळेल.

# खासदार 'नॉट रिचेबल' मध्येच निघाले वर्षे

## वर्धेकरांमध्ये खा. अमर काळे बद्दल नाराजीचा सूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९वर्धा**

गेले दोन वर्ष देशात निवडणुकांचे वारे होते. राज्यात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका झाल्या. लोकसभेत भाजपा उमेदवाराचा पराभव झाला तर विधानसभेत भाजपाने चार उमेदवार निवडून आणत विक्रम केला.



वर्धा लोकसभा निवडणूक ज्या पद्धतीने खेळल्या गेली ती दोन्ही पक्षाला फार सोपी नव्हती. परंतु, सत्ताधार्यांविरुद्ध प्रपोगंडा करण्यात विरोधक यशस्वी झाले. सहज उपलब्ध होणारे अशी ओळख असलेले रामदास तडस यांचा पराभव झाला. मात्र, गेल्या एक वर्षात खा. अमर काळे नॉट रिचेबल असल्याच्या नाराजीतच खासदारकीची वर्षपुर्ती झाली.

वर्धा लोकसभा मतदार संघ हा काँग्रेसच्या ताब्यात होता. परंतु, येथे काँग्रेसला सेनापतीच राहिला नसल्याने लोकसभेची जागा शरद पवार गटाकडे गेली. काँग्रेसमध्ये असलेले अमर काळे लोकसभेचे उमेदवार झाले. केंद्र सरकारच्या विरोधी भूमिकेसह वर्धेतील बजाज पुलाचे बांधकाम, तळेगाव आर्वी मार्ग, रेल्वेचे थांबे आदी स्थानिक मुद्यांवर ही निवडणूक लढल्या गेली. काही समाजिक संघटनांनी एक वर्षांपूर्वीपासुन मतदार संघाची बांधणी केली होती. त्याचा अप्रत्यक्ष फायदा महा विकास आघाडीत शरद पवार गटाचे उमेदवार अमर काळे यांना झाला. देशातील विरोधी लाट वर्धेतही पत्थ्यावर पडली. अमर काळे खासदार म्हणून निवडून आले. नवीन खासदार मिळाल्याचा आनंद वर्धेकरांना फार काळ मिळू शकला नाही.

पहिले काही दिवस हारतुर्यांमध्ये गेले. त्यानंतर काम घेऊन जाणार्यांना आर्वीला जावे लागत होते. प्रसिद्धी माध्यमं, समाज माध्यमांवरून खासदारांचे जनसंपर्क कार्यालय जिल्हास्थानावर नसल्याची टीका होऊ लागली. त्यानंतर वर्धेत जन संपर्क कार्यालय उघडल्या गेले. परंतु, आजही त्या ठिकाणी खा. काळे यांचे स्वीय सहाय्यकांनाच निवेदन स्वीकारावे लागले.एक वर्षाच्या काळात खा. काळे आपल्या जनसंपर्क कार्यालयात किती लोकांना भेटले असतील हा संशोधनाचा विषय ठरावा. मात्र, खा. काळे भेटतच नाही. फोन उचलत नाहीत, अशी ओरड एक वर्षानंतरही होत असुन आता माजी खासदार रामदास तडस यांच्या कार्यशैलीसोबत खा. काळे यांची वर्धेकर तुलना करू लागले आहेत.

खा. काळे निवडून आल्यानंतर वर्धेतील उड्डाणपूल लगेच वाहतुकीसाठी सूरू होईल, असे वातावरण तयार करण्यात आले होते. आर्वी तळेगाव रस्त्यासाठी तडस यांच्या घरापुढे आंदोलन करणारे काळे निवडून आल्यानंतरही तो प्रश्न मार्गी लागू शकला नाही. रोजगाराची समस्या, रेल्वेचे थांबेही किती स्टेशनवर मिळाले असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.याशिवाय खासदार म्हणून ज्या समित्यांचे गठण करण्याची जबाबदारी असते त्या समित्याही खा. काळे यांनी गठीत केल्या नाही. या समित्यांचे गठण केले असते तर त्यांच्याच पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकार्यांना फायदा झाला असता. परंतु, एक वर्षात आपल्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांना न्याय देऊ शकले नाही. खासदारकीची वर्षपूर्ती मतदारांच्या निराशेचीच ठरल्याचे फिरता फिरता कळले.

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक सर्व शक्तीनिशी लढा जिल्हाप्रमुख गोपाल पाटिल अरबट यांचे पदाधिकाऱ्यांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९दर्यापूर**

शिवसेना मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी शिवसेनेच्या वतीने नियोजनपूर्वक तयारी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर अमरावती जिल्हा शिवसेना यांच्या वतीने जिल्हा प्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वात ७ जुन रोजी आढावा व नियोजनात्मक बैठकीचे आयोजन विश्रामगृह अमरावती येथे करण्यात आले होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवसेना नेत्या प्रितीताई बंड तर प्रमुख पाहुणे म्हणून सहसंपर्क प्रमुख रविभाऊ गणोरकर होते.



या प्रसंगी पदाधिकारी व शिवसैनिकांना मार्गदर्शन करतांनी जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी कडक सुचना दिल्या. आपल्या भाषणात त्यांनी मला कोनत्याही परिस्थितीत येणा-या महानगरपालीका, नगरपरिषदा, जि परीषद, पंचायत समिती, एवढेच नव्हे तर सरपंच पदाच्या निवडणुकीत सुध्दा शिवसेनेचे प्रतिनिधी विजयी हवे आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येकाने कामाला लागून प्रत्येकाने आपापल्या कार्यक्षेत्रात प्रभावी पणे कार्य करा असे आदेश पदाधिकाऱ्यांना दिले.

आपल्याला पक्षाने ज्या ज्या पदावर नियुक्ती करुन कामं करण्याची संधी दिली त्या संधिचे सोने करा व आपल्या पदाला न्याय द्या असे आवाहन करतांनी दर पंधरा दिवसानी आपल्या कार्याचा आढावा घेण्यात येईल, त्या मधे कामकुचार पणा केल्यास अशा अकार्यक्षम पदाधिकाऱ्यांना पदावरुन कमी करण्याचा ईशारा सुध्दा जिल्हा प्रमुख गोपाल पाटिल अरबट यांनी दिला या पुढे बोलतांना मला कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक संस्थेवर शिवसेनेचे प्रतिनिधी हवे आहेत त्याकरीता सर्वानी सदस्यता नोंदनी करुण गाव तिथे शाखा घर घर शिवसेना हा उपक्रम राबवुन जनसंपर्क वाढविण्याचे आवाहन सुध्दा केले.

आता गरज आहे फक्त आपल्याला कामं करण्याची म्हणुन सर्वांनी कामाला लागा असे आवाहण केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालण ऊपजिप्रमुख सुनिल केने यांनी तर आभार प्रदर्शन शहर प्रमुख आशिष ठाकरे यांनी केले.या प्रसंगी सहसंपर्क प्रमुख रवि भाऊ गणोरकर, राजेंद्र गायगोले, उपजिल्हाप्रमुख सुनील केने गुरुजी यांनी मार्गदर्शन केले.या बैठकिला बहुसंख्य शिवसैनिक व पदाधिकारी हजर होते. यात जिल्हाप्रमुख गोपाल अरबट, प्रितीताई बंड, सहसंपर्क प्रमुख रवी गणोरकर, राजेंद्र गायगोले, युवा सेना लोकसभा अध्येक्ष प्रवीण दिधाते महिला आघाडिच्या जिप्रमुख अरुणा ईंगोले, रेखाताई खारोडे, जयश्री कातखिडे, मदत कशाच्या सोनाली देशमुख, ऊपजिल्हा प्रमुख केने गुरुजी, शहर प्रमुख आशिष ठाकरे, शहर संघटक मुकेशभाऊ ऊसरे अमोल भुयार महानगरप्रमुख रश्मी तायडे सारिका जयस्वाल भारती विश्वकर्मा संगीता गावंडे संगीता महावी मीनाक्षी कपले मनोज पांडे राजेश सूर्यवंशी चंद्रशेखर आसोले गजानन कात्रे गजानन मोरे गणेशराव भुजाडे अविनाश जवंजाळ गजानन सगने प्रवीण कडू गजाननराव देवके सुरेश कडू सुधीर खंडार महेंद्र भांडे ज्ञानेश्वर अढाऊ अमर करोशिया सरिता मेश्राम रूपाली मुरसकर अलका कलावटे पदाधिकारी उपस्थित होते.

# ४ ऑगस्ट ला अंबानगरीत होणार ९६ तासाचा वर्ल्ड रेकॉर्ड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

सुरसंगीत कराओके क्लब व छत्रपती बहुउद्देशीय व क्रीडा विकास संस्था अमरावती तसेच मनीष पाटील फाउंडेशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ऑगस्ट २०२५ ला रंगोली लॉन येथे ९६ तासाचे वर्ल्ड रेकॉर्ड पूर्ण करण्याकरता अमरावतीतील सुर संगम कराओके क्लब यांनी ९६ तासाचा वर्ल्ड रेकॉर्ड पूर्ण करण्याचा मानस केला आहे. या कार्यक्रमासंदर्भात सर्व कॉर्डिनेटर व सर्व ऑर्गनायझर यांची एक संयुक्तपणे बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये नागपूर येथील मनीष पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष व वर्ल्ड रेकॉर्ड चे जुरी मेंबर मनीष पाटील सर या सभेला आवर्जून उपस्थित होते. त्यांनी किशोर दा वर्ल्ड रेकॉर्ड ९६ तास या कार्यक्रमा संदर्भात सर्व कॉर्डिनेटर व सर्व ऑर्गनायझर यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच सुरसंगीत कराओके क्लबचे अध्यक्ष प्रभूदासजी फंदे यांनी या होणाऱ्या कार्यक्रमाबद्दल सर्वांना विस्तृत माहिती देऊन कार्यक्रम कसा यशस्वी करता येईल याबद्दल सविस्तर चर्चा केली.तसेच रॉकस्टार म्युझिकल ग्रुपचे संचालक शैलेशजी शिरभाते यांनी सुद्धा आपल्या काही टिप्स दिल्या.हा कार्यक्रम नुसते वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा उद्देश नसून यामध्ये कॅन्सर अवेअरनेस ,झाडे लावा झाडे जगवा ,इत्यादी बाबत जनजागृती करणे हा मुख्य उद्देश मनीष पाटील फाउंडेशन नागपूर व छत्रपती बहुउद्देशीय व क्रीडा विकास संस्था द्वारा राबविण्यात येईल. यामध्ये १४ वर्षांपर्यंतच्या कुठल्याही कॅन्सरग्रस्त मुला-मुलींना कॅन्सर झाला असेल तर त्यांना विनामूल्य या आजारावर उपचार करण्याकरता ही संस्था नेहमीच कार्य करत असते तरी असा कुठलाही रुग्ण आढळला असल्यास आम्हाला त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन सुद्धा या बैठकीमध्ये करण्यात आले .त्याचप्रमाणे त्यांनी ९६ तासाच्या वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये जास्तीत जास्त महाराष्ट्रभरातून २२५ गायकांना प्रवेश घेता येणार आहे .त्याकरता रजिस्ट्रेशन सुरू झाले असून ज्या कोण्या गायकाला सहभागी व्हायचे असेल तरी त्यांनी आपल्या जवळच्या कॉर्डिनेटर किंवा ऑर्गनायझर सोबत संपर्क साधून आपले रजिस्ट्रेशन करून आपला प्रवेश निश्चित करावा.या कार्यक्रमांमध्ये फक्त २२५ कलाकारांना भाग घेता येईल त्यानंतर रजिस्ट्रेशन बंद करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या गायकाला वर्ल्ड रेकॉर्डच्या गीत गायन कार्यक्रमात सहभागी होता येणार नाही. तरी ज्यांना या वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये भाग घ्यायचा असेल त्यांनी लवकरात लवकर आपला प्रवेश निश्चित करावा.असे आवाहन सुरसंगीत कराओके क्लबचे अध्यक्ष प्रभूदासजी फंदे यांच्याकडून सांगण्यात आले .या कार्यक्रमाला नागपूर येथील मनीष पाटील, प्रभु दासजी फंदे, पवन फंदे, इरफान भाई,शैलेश शिरभाते, राजेंद्र ठाकरे ,राजेंद्र वाघमारे ,पराग अंबाडकर, बबलू ठाकूर,सौरभ पाचडे, विजय गायकवाड, अविनाश देशमुख, उद्धव झुकरे, अविनाश देशमुख, संजय मोहोळ, मिलिंद जोशी, शशिकांत देशमुख, शशिकांत ढोले ,राजेश परमार ,शिवलकर साहेब, जयंत वसतकर,खलील भाई, दीपक धानोरकर, कडू साहेब, जोशी साहेब नंदकिशोर वानखडे, जोशना शेटे, गौरी सतके, कल्पना नाईक, वेदांती पाटील, मनीषा राऊत, प्रामुख्याने उपस्थित होते.



# अप्पर वर्धा जलाशयात मुलाचा बुडून मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९मोर्शी**

अप्पर वर्धा धरणात पोहण्यासाठी गेलेल्या १६ वर्षीय मुलाचा बुडाल्याने मृत्यू झाला. ८ जून रोजी दुपारी ३:००च्या सुमारास हा घटनाक्रम घडला. तीन तासांनी त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.पोलिस सूत्रांनुसार, अल्फेज काजी जाकीर काजी (१६, रा. शहापूर, ता. वरूड, ह. मु. नूर कॉलनी, मोर्शी) असे मृताचे नाव आहे. मामा रिजवान खानकडे मिस्त्रीकाम शिकण्यासाठी तो मोर्शी येथे आला होता. ८ जून रोजी दुपारी २ वाजता परिसरातील आठ ते नऊ तरुण त्याच्यासोबतअप्पर वर्धा जलाशयात पोहण्यासाठी उतरले. अल्फेज हा इतर तरुणांपेक्षा पुढे पोहत होता, तो पाण्यात बुडत असल्याचे पाहून या घटनेची माहिती मोर्शी पोलिसांना दूरध्वनीद्वारे देण्यात आली. ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी स्कॉडचे उपनिरीक्षक अमोल बुरकुल व अधीनस्थ चमू घटनास्थळी पोहोचली. हिवरखेड येथील मासेमारी करणाऱ्यांना पाचारण केले. मोर्शी येथील आपदा निवारण चमूसुद्धा दाखल झाली. संयुक्त तपासात अल्फेजचा मृतदेह सायंकाळी ६ वाजता पाण्याबाहेर काढण्यात त्यांना यश प्राप्त झाले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदनानंतर करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात दिला. सागर तायडे, प्रियांशु तायवाडे, विवेक सावरकर, राज कुरवाडे, सतीश खंडारे, नईम खान, अजिज पठाण, निसार पठाण, शेर खान, रिजवान खान, सय्यद अहफाज, अशफाक अहमद, आप्पा गेडाम यांनी घटनास्थळी जाऊन सहकार्य केले. पुढील तपास मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अमोल बुरुकुल, कॉन्स्टेबल स्वप्नील बायस्कर, छत्रपती करपते, श्याम चुंगडा, गोपाल घाटे, रविकांत जामनेकर करीत आहेत.



# अंधश्रध्दा निर्मूलन समितीची कार्यकारिणी गठित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत कार्यकारिणी गठित करण्यात आली. यामध्ये अमरावती शहर कार्याध्यक्षपदी दिलीप लाडे यांची निवड करण्यात आली.

७ जून रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा व शहर शाखेच्यावतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रम, राधानगर, अमरावती येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जिल्हा व शहर शाखा कार्यकारिणीची बैठक उत्साहात झाली. या बैठकीत दिलीप लाडे यांची अमरावती शहर शाखेच्या कार्याध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अंनिसचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रा. डॉ. सतीश तराळ होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रधान सचिव महाराष्ट्र गजेंद्र सुरकार, समाजकार्य महाविद्यालय प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. राजकुमार दासरवाड, प्रा. डॉ. प्रशांत विघे आणि अंनिस अमरावती उपाध्यक्ष प्रमोद कोळमकर हे उपस्थित होते.बैठकीची सुरुवात अंधश्रद्धा निर्मूलन गीताने झाली. त्यानंतर सर्व मान्यवरांचा परिचय करून देण्यात आला.दिलीप लाडे यांची अमरावती शहर शाखेच्या कार्याध्यक्षपदी, मोहम्मद अफसर शेख हसन यांची बुवाबाजी भंडाफोड विभागाचे जिल्हा कार्यवाहपदी, सतीश राजू पठाडे यांची युवा विभागाचे जिल्हा कार्यवाहपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.तसेच गजेंद्र सुरकार यांची राज्य प्रधान सचिव म्हणून निवड झाल्याबद्दल व नवनियुक्त शहर कार्याध्यक्ष, जिल्हा कार्यवाहपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. बैठकीत आगामी उपक्रमांचेनियोजन करण्यात आले, तसेच कार्यकर्त्यांसाठी क्षमता विकास शिबिर, शिक्षकांसाठी जागृती शिबिर, तसेच चमत्कार प्रयोग कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले.सभेच्या शेवटी अंधश्रद्धा निर्मूलन गीत घेऊन बैठकीचा समारोप झाला. संचालन नागेश तातोड यांनी, तर आभार प्रदर्शन सतीश पठाडे यांनी केले. या बैठकीला आशिष देशमुख, विजय डवरे, दिगंबर मेश्राम, स्नेहा वासनिक, हेमंत अमृतकर, प्रवीण गुल्हाने, करण वानखडे, सुरेखा रंगारी, नागेश तातोड, माया खडसे, बेबी चौधरी, रंजना डोंगरे, विजया करोले, दीपक कोष्टी, वनिता कोष्टी व इतर मान्यवर उपस्थित होते.

## शहर कार्याध्यक्षपदी दिलीप लाडे यांची निवड



# शिक्षकांवर लष्करी शिस्त लादणाऱ्या व असंवेदनशील वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करा : प्रशिक्षण ऑफलाईन आणि उपस्थिती ऑनलाईन

## जखमी शिक्षकांच्या उपचाराचा खर्च शासनाने करावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

वरिष्ठ वेतन श्रेणी आणि निवड श्रेणी प्रशिक्षणासाठी रत्नागिरी येथे वेगाने जाणाऱ्या शिक्षकांच्या गाडीला झालेल्या अपघातामुळे राज्यभरातील शिक्षकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण आहे. या अपघाताचे प्रमुख कारण म्हणजे प्रशिक्षणस्थळी वेळेवर पोहोचण्यासाठी झालेली घाई. प्रशिक्षणा साठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेचे (चडउएठढ) प्रमुख राहुल रेखावार यांनी दाखवलेली असंवेदनशीलता आणि कठोर धोरण शिक्षकांच्या मनात तीव्र संताप व्यक्त करणारे आहे आहे.विशेष म्हणजे हे प्रशिक्षण ऑफलाईन आणि उपस्थिती ऑनलाईन या मुळे कीत्येक शिक्षकांना प्रशिक्षणा पासुन वंचित ठेवले आहे.शिक्षकांच्या या धावपळीत असा अपघात घडतो त्यामुळे अश्या अधिकार्यावर कार्यवाही झाली पाहीजे.तसेच जखमी शिक्षकांचा सर्व खर्च शासनाने करावा अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे.

प्रशिक्षणासाठी काही मिनिटे उशीर झालेल्या शिक्षकांना प्रशिक्षणास अनुपस्थित म्हणून नोंदवले गेले. पहिल्याच दिवशी गावावरून, परराज्यातून धावपळ करत प्रशिक्षणासाठी पाच मिनिटे उशीर झालेल्या शिक्षकांना तुम्हाला प्रशिक्षण करता येणार नाही असे सांगण्यात आले, व त्यांना घरी पाठवण्यात आले.



प्रशिक्षणात वेळेवर उपस्थित राहूनही गर्दीमुळे वेळेत सही न करता आलेल्या शिक्षकांनाही प्रशिक्षणास मुकावे लागले. एका शिक्षकास प्रशिक्षणादरम्यान प्रकृती बिघडल्याने हॉस्पिटलमध्ये जावे लागले. त्याने दुसऱ्या दिवशी पुन्हा हजर राहण्याची विनंती केली, परंतु त्यालाही परवानगी नाकारण्यात आली. यामुळे शेकडो शिक्षकांना प्रशिक्षणास मुकावे लागले. ही बाब अत्यंत निंदनीय असून, शिक्षकांवर अविश्वास दाखवणारी आणि शिक्षण प्रक्रियेत लष्करी शिस्त आणणारी आहे. सर्व शिक्षक संघटना आणि शिक्षक व पदवीधर आमदारांनी वारंवार विनंती करूनही आपला हट्ट कायम ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला संवेदनशीलता असू नये ही खेदाची बाब आहे.

शिक्षक हे शिस्तप्रिय असतातच, पण त्यांच्यावर अशी संशयाची नजर आणि अमानवी धोरणे लादणे म्हणजे शिक्षण व्यवस्थेच्या मूलभूत मूल्यांना धोका निर्माण करणं आहे. नियमांची कडक अंमलबजावणी करणं म्हणजे शिक्षकांच्या भावनांशी खेळ करणं होय. याचा आम्ही तीव्र निषेध करतो.

राज्य सरकारने याबाबत तातडीने हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. प्रशिक्षण राबवण्याच्या पद्धतीमध्ये अनेकांचे आक्षेप आहेत. त्याचा विचार करून लवचिक धोरण अमलात यावयास हवे. ज्या शिक्षकांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवले गेले त्यांना पुन्हा प्रशिक्षणात सामील करून घ्यावे. शिक्षण खात्यात शिक्षणावर, शिक्षकांवर व विद्यार्थ्यांवर विश्वास असणारे, संवेदनशील अधिकारी कार्यरत असावेत.

# बच्चू कडूंचा अन्नत्याग आंदोलनाचा निर्धार कायम, आंदोलनाचा आजचा दुसरा दिवस

## आमदार रोहित पवार यांच्या सह शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग बांधवांचा पाठिंबा






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी आमदार बच्चू कडू यांनी गुरूकूंज मोझरी येथे सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी त्यांचे समर्थक मोठ्या संख्येने मोझरी येथे दाखल होत असून मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार बच्चू कडू यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान सोमवारी दुपारी डॉक्टरांच्या पथकाने बच्चू कडू यांची वैद्यकीय तपासणी केली.

मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीस्थळाजवळ कालपासून अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात झाली. बच्चू कडू यांच्यासमवेत प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी आणि अनेक शेतकरी उपोषणात सहभागी झाले आहेत. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, शेतमजुरांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याला विमा संरक्षण मिळावे, शेतमजुरांचे आर्थिक हित जपण्याकरिता स्वतंत्र मंडळाची उभारणी व्हावी, लागवड ते कापणीपर्यंतच्या सर्व शेतीकामांचा समावेश महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत करावा. हे शक्य नसल्यास तेलंगणाच्या धर्तीवर एकरी १० हजार रुपयांची मदत देण्यात यावी. रासायनिक खतांप्रमाणे सेंद्रिय तसेच मेंढी खतालादेखील अनुदान देण्याची तरतूद करण्यात यावी, दुधातील भेसळ रोखत गाईच्या दुधाला ५० रुपये तर म्हशीसाठी ६० रुपये प्रतिलिटर असा दर निश्चित करावा. कांद्याचे दर स्थिर राहावेत याकरिता ४० रुपये दर होईस्तोवर निर्यात बंदी लागू करू नये, या मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी हे आंदोलन सुरू केले आहे.

**रोहित पवार यांचा पाठिंबा**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी बच्चू कडू यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला आहे. बच्चू कडू हे आवाज नसलेल्या माणसांसाठी कायमच आवाज उठवत असतात. गेल्या दोन दिवसांपासून गुरूकूंज मोझरी येथे विविध मागण्यांसाठी त्यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. त्यापैकी शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी यासारखी आश्वासने तर निवडणुकीपूर्वीच सरकारने दिली आहेत. त्यामुळे राजकीय मतभेद काहीही असले, तरी त्यांच्या मागण्या या रास्त असल्याने बच्चू कडू यांच्या आंदोलनाकडे गांभिर्याने पाहून सरकारने त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात आणि बच्चू कडू यांनीही आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# अमरावतीतील रखडलेल्या पठाण चौक उड्डाणपुलाची खासदारांकडून पाहणी

## उड्डाणपुलाचे विकास कार्य तातडीने पूर्ण करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

अमरावती शहरातील अनेक वर्षांपासून रखडलेल्या पठाण चौक परिसरातील उड्डाणपुलाच्या विकासकामांची आज (सोमवार, ९ जून २०२५) रोजी प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. अमरावती शहराच्या विकासकामांमध्ये महत्त्वपूर्ण ठरणारा हा उड्डाणपूल लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांसाठी खुला करावा, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रशासनाकडे केली.



यावेळी सोबत अनेक महत्त्वाचे नेते आणि अधिकारी उपस्थित होते. यात माजी पालकमंत्री सुनीलभाऊ देशमुख, मनपाचे माजी महापौर विलासभाऊ इंगोले आणि मिलिंदभाऊ चिमोटे, तसेच काँग्रेस कमिटी अमरावतीचे शहराध्यक्ष बबलूभाऊ शेखावत यांचा समावेश होता. या सर्व नेत्यांनी आणि उपस्थित जनसमुदायाने उड्डाणपुलाचे काम तातडीने पूर्ण होणे किती महत्त्वाचे आहे, यावर भर दिला.

या पाहणीदरम्यान, अमरावती काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक सेल चे पदाधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी, अमरावती शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि शहर काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी एकत्रितपणे प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला.पठाण चौक उड्डाणपूल हा अमरावती शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवासाची सुलभता वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा पूल पूर्ण झाल्यास नागरिकांचा वेळ वाचेल आणि वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होईल. प्रशासनाला या कामाला गती देण्याचे आवाहन केले असून, नागरिकांना लवकरच या पुलाचा लाभ मिळावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

# शासकिय कामाचा पहिला दिवस अन् अधिकारी कर्मचारी गैरहजर

## माजी आमदारांचा शासकीय कार्यालयावर सर्जिकल स्ट्राइक : कार्यालय प्रमुखांना गैर हजर कर्मचाऱ्यांचे वेतन कपात करण्याचे सुचविले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९धारणी**

मेळघाटातील धारणी तालुक्यातील शासकीय कार्यालयातील अधिकारी कर्मचारी सतत गैरहजर राहत असल्यामुळे आदिवासी बांधवांची रेंगाळलेली कामे वेळेवर होत नाही याबाबत मेळघाटचे माजी आमदार तथा भाजपचे नव निर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांना अनेक आदिवासी बांधवांनी सांगितले होते त्याचा आढावा घेण्याकरता माजी आमदार भिलावेकरांनी सोमवारी सर्जीकल स्ट्राईक करत शहरातील सर्व शासकीय कार्यालयात भेटी देऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गैरहजरीचा मोठा अहवालच मिळविला आहे त्यामुळे गैरहजर अधिकारी कर्मचाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे



धारणी शहरामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग ,पंचायत समिती, प्रकल्प कार्यालय, तहसील ,भूमी अभिलेख, नगरपंचायत , पाणीपुरवठा जिं प बांधकाम विभागासह शासनाच्या प्रत्येक विभागाचे कार्यालय शहरात आहे त्या ठिकाणी शंभर ते दीडशे किलोमीटर दूर वरून शासकीय काम करण्यासाठी येणाऱ्या आदिवासी बांधवांना कार्यालयात आले असता अधिकारी कर्मचारी सतत गैरहजर तर आठवड्याच्या मधात चाटा मारत असल्याने अनेक आदिवासी बांधवांची कामे रेंगाळली होती याबाबत आदिवासी बांधवांनी मेळघाटचे माजी आमदार प्रभू दास भीलावेकर यांच्याकडे वारंवार तक्रारी केला त्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रभुदास भीलावेकर यांनी सोमवारी दुपारी बारा वाजता नंतर आढावा घेतला असता पी डब्ल्यू डी सार्वजनिक बांधकाम विभागात अधिकारी कर्मचारी हजर नव्हते तर अभियंत्याच्या कार्यालयाला मोठे कुलूप लागले होते तर आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग मध्ये फक्त एकच कर्मचारी हजर होते तिथेच लागून असलेल्या मृदे व जलसंधारण विभागाच्या कार्यालयाला सतत कुलूप लागले होते लागलेले असते ते कधीच उघडत नसल्याची माहिती समोर आली तर भूमी अभिलेख कार्यालयात सात पैकी तीनच कर्मचारी हजर होते त्यापैकी एकाने त्यांच्या समोरच हजेरी मस्टर वर दुपार नंतर स्वाक्षरी केली तर पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी विजय गायकवाड हे हजर होते त्यांच्याकडून कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या आढावा घेतला असता एकूण ४९ कर्मचाऱ्यापैकी दहा कर्मचारी कार्यालय प्रमुखांना न सांगता गैरहजर होते तर पाच कर्मचारी किरकोळ सुट्टीवर असल्याचे त्यांनी सांगितले त्या सहइतरही सर्व शासकीय कार्यालयाचा आढावा घेत आपला सर्जिकल स्ट्राइक सुरूच ठेवला तेव्हा त्यांना इतरही कार्यालयातून गैरहजर कर्मचाऱ्यांबाबत चांगलाच अहवाल हाती मिळाला असल्याने त्यांनी कार्यालय प्रमुखांना गैर हजर कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचे सुचविले आहे यावर सध्या कार्यालय प्रमुख काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

> अधिकारी कर्मचाऱ्यांना वेटणीवर अन्याय करता असा दर आठवड्यात कोणत्याही दिवशी कोणत्याही वेळी कार्यालयीन कोणत्या वेळी सर्जिकल स्ट्राइक करण्यात येईल याची अधिकारी कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी अन्यथा कारवाईला समोर जाण्याची तयारी ठेवावी.
>
> **माजी आमदार प्रभुदास भिलावेकर मेळघाट**

# पुस्तकांचा बाजार भरला..पण हवे ते मिळेना; पालक गोंधळात

## कोरी पाने नसलेली व फक्त अभ्यासक्रम असलेली पुस्तके, यापैकी कोणती घ्यावी?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राज्य प्राथमिक शिक्षण मंडळाच्या शाळा १६ जून रोजी सूरू होणार असल्याचे परिपत्रक निघाले आहे. म्हणून पालक आपल्या पाल्यांना घेऊन पुस्तक खरेदीसाठी घराबाहेर पडताहेत. काल रविवार असल्याने मोठी झुंबड उडाली होती. पण हवे ते पुस्तक मिळेचना. कारण कोणती पुस्तके हवी याची यादी पालकांना देण्यात आली होती. शाळा सूरू होण्यास काहीच दिवस बाकी. म्हणून पुस्तक खरेदीची झुंबड. पण हवी ती पुस्तकेच बाजारात नव्हती.

बालभारती ही संस्था चालू वर्षासाठी पुस्तके प्रकाशित करण्यास जबाबदार. त्यांनी तशी ती छापली. पूर्वी शिल्लक असलेली इंटींग्रेटेड म्हणजे पुस्तकास कोरी पाने असलेली व पण तशी भूमिका रद्द झाल्याने कोरी पाने नसलेली व फक्त अभ्यासक्रम असलेली पुस्तके, यापैकी कोणती घ्यावी असा प्रश्न. कारण दिलेल्या यादीत



गतवर्षिचीच नोंद होती. म्हणून तशीच पुस्तके मिळावी, असा पालकांचा आग्रह. पण शालेय शिक्षण विभागाचा आदेश गोंधळ निर्माण करून गेला. कारण यावर्षी कोरी पाने नसणार असा आदेश तर यादी मिळाली ती जुन्याच कोरी पाने असलेल्या पुस्तकांची. यावर्षी इंटींग्रेटेड पुस्तके मिळणार नव्हती. मात्र बालभारती संस्थेकडे मागील निगमानुसार छापण्यात आलेल्या पुस्तकांचा व यावर्षी छापण्यात आलेल्या पुस्तकांचा साठा पण उपलब्ध होता. पण यापैकी कोणते घ्यावे, असा प्रश्न. म्हणून प्राप्त जुन्या यादीचा हट्ट पालक धरून बसले आणि बाजारात गोंधळास सुरवात झाली. हवे ते मिळत नाही म्हणून पालक माघारी फिरत असल्याचे चित्र आहे.

विदर्भ मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सतीश जगताप म्हणतात की खरे काय ते समजून नं घेतल्याने गोंधळ सूरू आहे. पण अपेक्षित साठा उपलब्ध असून पालकांनी मुख्याध्यापकांशी बोलून घ्यावे, असे ते म्हणाले.

# विदर्भातल्या शेतकऱ्यानं केली संत्री पिकात क्रांती, एआयच्या मदतीनं एका झाडाला लागतायत १५०० फळं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अचलपूर**

संत्र्याच्या झाडाला रोज पाणी किती हवं? खतांची खरंच गरज आहे का? झाडावर किंवा फळाला कीड लागलीय का? अशी सर्व माहिती मोबाईल फोनवर मिळत असेल आणि सकाळी उठल्यावर अवघ्या १५ मिनिटात आपल्या संत्रा बागेची संपूर्ण माहिती घेऊन संत्रा उत्पादक शेतकरी नियोजन आखत असेल तर आश्चर्य वाटायला नको. कारण हे सारं आता एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ताद्वारे शक्य झालंय.

अमरावती जिल्ह्यात अचलपूर तालुक्यात खरपी या छोट्याशा गावात विजय बिजवे यांच्या शेतात या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कधी नव्हे इतका संत्रा बहरलाय. एका झाडावर १००० ते १५०० फळं आता विपरीत परिस्थितीतही लागलेली आहेत. हे तंत्रज्ञान शेतीसाठी वरदान ठरलंय, भविष्यात विदर्भातील संत्र्यांची गोडी आणखी वाढवणार, अशी आशा निर्माण झाली आहे.

विजय बिजवे यांच्या शेतात इंटरनेट प्रणालीवर चालणारं सेन्सर उभारण्यात आलंय. या सेन्सरद्वारे उपग्रह प्रणालीच्या माध्यमातून संपूर्ण ८ एकर शेतात लागलेल्या संत्रा पिकाचं निरीक्षण केलं जातय. विशेष म्हणजे, शेतातील १२०० झाडांचं संपूर्ण व्यवस्थापन या तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. झाडावर आणि फळांवर येणाऱ्या किडीचं व्यवस्थापनसुद्धा या तंत्रज्ञानामुळं शक्य झालय. या शेतात ओलावा किती? हे सांगणारं सेन्सर लावण्यात आलय. याद्वारे जमिनीचं तापमान आणि जमिनीचा ओलावा कळतो. या सेन्सरवर सोलर पॅनल लावलं असल्यानं वातावरणातील तापमान, आर्द्रता, सूर्यप्रकाशाची तीव्रता कळते, अशी माहिती या तंत्रज्ञानातील नाशिक येथील एआय आणि कृषीतज्ञ डॉ. भूषण गोसावी यांनी दिली.

संत्रा पिकाला योग्य इरिगेशनची गरज आहे. या तंत्रज्ञानाद्वारे बिजवे



यांच्या शेतात खास स्मार्ट इरिगेशन शेड्युल आखून देण्यात आलंय. शेतात पाणी किती उपलब्ध आहे? पिकांच्या अवस्थेनुसार आणि मातीच्या प्रकारानुसार एखाद्या पिकाला पाण्याची किती गरज आहे या बाबतची माहिती या तंत्रज्ञानाद्वारे आपल्या मोबाईल ॲपमध्ये कळते. याठिकाणी स्मार्ट इरिगेशन शेड्युल लावण्यात आलं. त्यामुळं जमिनीत उपलब्ध असणारी खतं किती आहेत आणि ती कशी आहेत याची माहिती उपग्रहाच्या माध्यमातून कळते. यामुळं मातीची नेमकी कशी अवस्था आहे, हेही लक्षात येतं. मातीमध्ये नायट्रोजन, पोटॅशियम, फॉस्फरस यांचं प्रमाणही कळतं आणि कोणते घटक जमिनीत कमी आहेत? हे लक्षात येतं असंही डॉ. भूषण गोसावींनी सांगितलं.

बिजवे यांच्या शेतात पूर्णतः विषमुक्त संत्री आहेत. विशेष म्हणजे, बिजवे यांच्या शेतातून १५ किलोमीटरच्या परिसरात कोणाच्याही शेतात संत्री सेट झाली नाहीत. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यानं आमची ५० ते ६० टक्के आमची १५ वर्षांपासून संत्र्याची बाग आहे. सतत नुकसान होत असताना यावर्षी मुलगा गौरव यानं आपल्या शेतात एआय तंत्रज्ञानाचा वापर करू असा निर्णय घेतला. त्याचा हा निर्णय खरंच योग्य ठरला असं आता शेतात फिरताना वाटतं. लगतच्या शेतात कुठंही संत्री दिसत नसताना आमच्या शेतात एका झाडाला १००० ते १५०० फळं लागली आहेत. यावर्षी आमच्या उत्पन्नात निश्चित भर पडेल, असा विश्वास विजय बिजवे यांनी व्यक्त केला.

खरपी गावातील विजय बिजवे यांच्या शेतात सुरू असलेलं हे काम देशातील पहिलाच प्रयोग असल्याचंही डॉ. गोसावींनी सांगितलं. हा प्रयोग खरंच यशवी ठरणारा आहे? का याचा नेमका काय फायदा होतो आहे, याची माहिती घेण्यासाठी अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांतून अनेक शेतकरी बिजवे यांच्या शेतात भेट देत आहेत. कृषी क्षेत्रातील तज्ञांची भेट देणाऱ्यांमध्ये संख्या अधिक आहे. हे तंत्रज्ञान नवं असून येणाऱ्या काळात शेतीच्या भरभराटीसाठी आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी ते फायदेशीर ठरेल. अडचणीत सापडलेली विदर्भातील संत्री पुन्हा एआय तंत्रज्ञानामुळं जोमात बहरतील, असा विश्वास देखील डॉ. भूषण गोसावी यांनी व्यक्त केला.